ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

जुलै २०१२ • मूल्य १० ₹

## आंतरराष्ट्रीय रहस्याचा सनसनाटी भेद करणाऱ्या 'लॉक ग्रिफिन' या कादंबरीचे अनोखे प्रकाशन



'लॉक ग्रिफिन'च्या
इ-बुक प्रकाशनसमयी
बुकगंगाचे विवेक चितळे,
लेखक वसंत वसंत लिमये,
राहुल सोलापूरकर
आणि
सचिन खेडेकर

'लॉक ग्रिफिन' कादंबरी
प्रकाशनसमयी
राहुल सोलापूरकर,
कुमार केतकर,
धनंजय गांगल,
लेखक वसंत वसंत लिमये
आणि
सचिन खेडेकर



# जानेवारी २०११ ते जून २०१२ या काळात प्रसिद्ध झालेली ग्रंथालीची प्रकाशने

**१. शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस
मूल्य २५० रु.

**२. दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर
मूल्य २२५ रु.

**३. नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर
मूल्य २०० रु.

**४. टिळक ते गांधी मार्गे खाडिलकर**
मुकुंद वझे
मूल्य १२० रु.

**५. मराठी भाषेतील असभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे
मूल्य २५० रु.

**६. ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर
मूल्य १२५ रु.

**७. अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे
मूल्य १५० रु.

**८. प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे
मूल्य ८० रु.

**९. आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी
मूल्य १८० रु.

**१०. माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू
मूल्य २७५ रु.

**११. संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे
मूल्य १५० रु.

**१२. परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत
मूल्य १५० रु.

**१३. तेजस्विनी**
स्मिता भागवत
मूल्य १५० रु.

**१४. मनातल्या वावटळी**
प्रगती कोलगे
मूल्य १०० रु.

**१५. आकार**
सदाशिव साठे
मूल्य २५० रु.

**१६. तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल
मूल्य २५० रु.

**१७. आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे
मूल्य १६० रु.

**१८. गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे
मूल्य ३०० रु.

**१९. बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल
मूल्य ६० रु.

**२०. भारती सृष्टीचे**
अनुराधा गांगल
मूल्य १२० रु.

**२१. संस्कार**
अनुराधा गांगल
मूल्य ६० रु.

**२२. रांगोळी**
अनुराधा गांगल
मूल्य १८० रु.

**२३. महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे
मूल्य १८० रु.

**२४. मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई
मूल्य १२० रु.

**२५. शांबरिका खरोलिका**
श्रीकांत पेटकर
मूल्य ६० रु.

**२६. प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील
मूल्य १८० रु.

**२७. आनंदाकार**
प्रकाश पेठे
मूल्य १०० रु.

**२८. हवा, पानी और...**
भारत गर्जेंद्रगडकर
मूल्य ७५ रु.

**२९. एका पत्रकाराची दुनिया**
भारत गर्जेंद्रगडकर
मूल्य १५० रु.

**३०. भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन डॉ. नरेंद्र जाधव
मूल्य ३०० रु.

**३१. आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर
मूल्य ३०० रु.

**३२. ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर
मूल्य १८० रु.

**३३. ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर
मूल्य २०० रु.

**३४. नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते
मूल्य ८० रु.

**३५. अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे
मूल्य १८० रु.

**३६. अजब सहवास**
गो.आ. भट
मूल्य १०० रु.

**३७. सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे
मूल्य १२० रु.

**३८. यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे
मूल्य २५० रु.

**३९. १९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे
मूल्य ३५० रु.

**४०. वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित
मूल्य ७५ रु.

**४१. कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी
मूल्य ३५० रु.

**४२. विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर
मूल्य १०० रु.

**४३. उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे
मूल्य ५०० रु.

**४४. वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले
मूल्य ८० रु.

**४५. ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण
मूल्य १५० रु.

**४६. आठवा चिरंजीव**
प्रतिभा मुडगेरीकर
मूल्य १५० रु.

**४७. वडोदरा**
प्रकाश पेठे
मूल्य ८० रु.

**४८. दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी
मूल्य ३५० रु.

**४९. आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय जोशी/जयश्री जोशी
मूल्य १०० रु.

**५०. कवडसे**
महेश केळुस्कर
मूल्य ७० रु.

**५१. दु:ख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ
६० रु.

**५२. साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले
२०० रु.

**५३. मनस्वी** – बाबूराव चंदावार
५०० रु.

**५४. मनोमनी** – जयश्री भिसे
७५ रु.

**५५. झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी)
१०० रु.

**५६. जैन हिल्सवरील जागरण**
भवरलाल जैन
१२० रु.

**५७. आठवणींची पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे
३०० रु.

**५८. अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर
मूल्य ३५० रु.

**५९. नाझी नरसंहार**
कुमार नवाथे
मूल्य १५० रु.

**६०. डायरी**
प्रवीण बर्दापूरकर
मूल्य १८० रु.

**एकूण ६० पुस्तकांचा संच मूळ किंमत १०७५० रु. • सवलतीत ५३०० रुपयांत घरपोच**
**सुटी पुस्तके घेतल्यास ३०% सवलतीत**

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जुलै २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक सातवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

धनत्तराने दारिद्र्य दाखवावे आणि त्याला आपल्या श्रीमंतीचा विसर पडावा अशी अवस्था आज माध्यमांची आहे. कुतूहल, जिज्ञासा अथवा समाजाचा कैवार असल्याचे भासवून, ज्या बेफिकिरीचा प्रत्यय बघता–वाचताना येतो त्यात निर्भीड पत्रकारिता नसून व्यावहारिक मतलब आहे हे ध्यानात न येण्याइतका वाचक/प्रेक्षक अजाण नाही. ज्या माध्यमातून सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय असा प्रश्न विचारला गेला त्या माध्यमांचेच डोके ठिकाणावर आहे काय असा प्रश्न पडतो. 'गॉड पार्टिकल'च्या निमित्ताने, ज्यांचा विज्ञानाशी आणि धर्माशीही धड संबंध नाही अशांची धर्मांधता आणि वैज्ञानिक प्रगती असल्या विषयावर सवंग चर्चा घडवून भलताच विषय चघळला गेला. असे प्रकार सर्रास चालले आहेत. 'माणूस देव होणार का?', 'देवाचे अस्तित्व संपले का?' असे प्रश्न निर्माण करणारे आदल्या दिवसापर्यंत आषाढीच्या वारीत रंगलेले असतात, विठोबाचे दर्शन घडवतात. एकूण काय, तर माध्यमांना देवच तारतो म्हणायचे! माणूस प्रत्यक्ष चंद्रावर उतरला तेव्हाही असले प्रश्न निर्माण झाले नसावेत. विज्ञानाने प्रगती साधली आणि देऊ केलेल्या साधनांचा होणारा वापर अतर्क्य आहे.

विज्ञान आपल्या गतीने जातच राहते. त्याचे सारे फायदे सर्वच समाजाला होत आलेले आहेत. तो ते घेतही आलेला आहे. मग तो आस्तिक असो वा नास्तिक. देव–धर्म, विज्ञान आणि व्यवहार यांच्या समांतर चालण्यातून, तरी परस्परावलंबीत्वातून समाज जगतो हे कुणाला पटले नाही तरी सत्य आहे.

महेश म्हात्रे यांनी पंढरपूरची वारी केली. त्यांना आकळलेले समाजमन त्यांनी या अंकात उलगडले आहे. प्रवीण बर्दापूरकर यांनी न भेटलेल्या मित्राबद्दल, प्रभाकर वाईरकर यांनी आर.के. लक्ष्मण यांच्या भेटीबाबत, शर्मिष्ठा भोसले यांनी 'सेवालय' आणि त्याचे संस्थापक रवी बापटले यांच्या कार्याबाबत लिहिलेले लेख या अंकात आहेत. यातून तीन व्यक्तित्वांच्या कर्तृत्वाला वंदना आहे. डॉ. मेहेंदळे यांचा लेख रस्त्यावरील बेशिस्तीच्या परिणामांची दखल घेतो.

वाद'ग्रस्त' न होता संवादपूर्ण होण्याचा प्रयत्न 'रुची'तून होत राहील.

**– कार्यकारी संपादक**

# न भेटलेला मित्र...

## प्रवीण बर्दापूरकर

हैदराबादच्या धनंजय कुलकर्णी यांच्या निधनाची बातमी प्रवासात असताना कळली आणि आजवरच्या आयुष्यात कधीही न भेटलेल्या या मित्राच्या अचानक जाण्याने मन कातर झाले, जीवाला चटका लागला...

धनंजय कुलकर्णी या नावाची ओळख जुनी; पंचवीसेक वर्षांपासून. या नावाने आंध्रप्रदेशसंबंधी बराच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक मजकूर 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकांत; तसेच 'लोकप्रभा' या साप्ताहिकात प्रकाशित होत असे. मजकूर जाणकार अंदाजात आणि सुलभ भाषेत, मनोरंजनात्मक शैलीतला असे. त्या मजकुराची मराठी जगतात बहुधा बऱ्यापैकी चर्चा असे.

या शैलीवरून लेखक पत्रकार असावेत असे वाटत असे. एकदा, 'लोकप्रभा'चा तत्कालीन संपादक प्रदीप वर्मा याने सांगितले की धनंजय कुलकर्णी हैदराबादचे आहेत, इंग्रजीचे प्राध्यापक आहेत, खूप वाचतात आणि भरपूर लिहितातही... वगैरे वगैरे. नंतर हैदराबादच्या मराठी साहित्य परिषदेचे मुखपत्र असलेल्या 'पंचधारा' या त्रैमासिकात त्यांचे लेखन दिसू लागले. त्या लेखनात गांभीर्य होते, त्या लेखनाच्या बाजातून त्यांच्यातला आवाका स्पष्ट दिसत असे. पुढे पंचधाराच्या संपादक मंडळाच्या यादीत त्यांचे नाव दिसू लागले. १९९६ मध्ये मी कोणत्यातरी वृत्तसंकलनासाठी हैदराबादला गेलो होतो तेव्हा त्यांचा नंबर मिळवून फोन केला तर कळले की ते गावात नाहीत आणि भेट राहिली. नंतर हैदराबादला जाणे झाले नाही. मात्र या धनंजय कुलकर्णी यांचे प्रकाशित होणारे विपुल आणि विविधांगी लेखन वाचत गेलो. ते आवडत होते आणि त्यातून बऱ्याच नवीन गोष्टी कळत होत्या. २०१०च्या 'रुची'च्या दिवाळी अंकात माझा आईवरचा लेख (माई) प्रकाशित झाला आणि एक दिवस सकाळी सेलफोन किणकिणला. 'मी हैदराबादहून धनंजय कुलकर्णी बोलतो आहे' हे सांगणारा तो फोन होता... तेव्हापासून आमची सेलफोन मैत्री सुरू झाली ती धनंजय कुलकर्णी यांच्या आकस्मिक निधनाचे वृत्त कळेपर्यंत. माई आणि अण्णांवर (माझे आई आणि वडील) मी लिहिलेले त्यांना खोलवर भिडले होते हे सांगण्यासाठी आलेला तो पहिला फोन सलग चाळीसएक मिनिटे सुरू राहिला. त्या बोलण्यातून आम्ही वयाने समकालीन आहोत हेही कळले आणि आमच्या परस्पर फोनमैत्रीत अगदी लगेच एक समंजसपणा आला. मराठवाडा हा समान दुवा निघाला आणि ही फोनमैत्री अधिक दृढ होत गेली. सकाळी लवकर उठण्याच्या समान सवयीमुळे आम्हाला साडेसात-आठच्या सुमारास भरपूर बोलून घेणे सोयीचे पडत असे. फोनवरच्या या बोलण्यांतून लक्षात आलेली बाब म्हणजे कोणाहीविषयी विखार किंवा असूया त्यांच्यात नव्हती. काही चांगले वाचले तर त्याचे खुलेपणाने कौतुक करण्याचा धनंजय कुलकर्णी यांच्यात एक विलक्षण उमदेपणा होता. लोकप्रभात माझा 'डायरी' हा स्तंभ सुरू असताना मला त्यांच्यातल्या या उमदेपणाचा अनेकदा अनुभव आला आणि उल्लेखनीय म्हणजे हा स्तंभ बंद झाल्यावर इतरांचे कौतुक त्यांच्याकडून मी अनेकदा ऐकले.


पहिल्या एक-दोन फोनभेटींतच लक्षात आले, की धनंजय कुलकर्णी यांचे महाराष्ट्र आणि मराठी साहित्य जगताबाबतचे ज्ञान खूपच 'अपडेट' असते. यात कार्यक्रम, नवी पुस्तके, साहित्य जगतातील राजकारण तसेच गॉसिप याचाही समावेश असतो. (याबाबतीत त्यांचे नाते न्यूयॉर्कच्या श्रीधर दामले यांच्याशी सख्खेपणाने नक्की जुळते!) एखादी बाब कन्फर्म नसेल तर 'त्याचं काय झालं हो नेमकं?' असा गुगली ते टाकत आणि नेमकी माहिती घेत. त्यांच्या या गुगलीवर 'मीच सापडलो का गुरू तुम्हाला?' असे मी विचारल्यावर ते खळाळून हसत आणि 'यू जर्नालिस्ट नेवर फ्लोग अ डेड हॉर्स' अशी कबुली देत हवी असलेली माहिती काढून घेत. महाराष्ट्रातल्या साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातील असंख्यांशी त्यांचा संपर्क आणि नियमित पत्रव्यवहार होता. इंटरनेटवरून मराठी वृत्तपत्रे बहुधा सकाळी उठल्यावर लगेच वाचून घेणे हा त्यांचा दैनंदिन परिपाठ होता. मराठी साहित्य आणि भाषेत जे जे काही नवे सुरू आहे त्याबाबत त्यांना जागते कुतूहल असे आणि ते शमवण्यासाठी त्यांची कायम धडपड सुरू असे. अनेक कार्यक्रम तसेच नुकत्याच प्रकाशित झालेल्या पण आपल्यापर्यंत न पोचलेल्या पुस्तकांची त्यांना माहिती असे, अनेक 'लिटररी गॉसिप्स' आपल्यापर्यंत पोचण्याच्या आत त्यांना माहिती झालेली असत, इतके त्यांचे मराठी साहित्य आणि मराठी मुलुखातील नेटवर्क

जबरदस्त होते. मात्र या गॉसिप्सची चर्चा करताना ते वैयक्तिक निंदानालस्ती आणि चारित्र्यहनन होऊ न देण्याची दक्षता बाळगत. अमराठी मुलुखात राहूनही मराठी मुलुखाशी त्यांची नाळ पक्की जुळलेली होती. मराठीशी असलेल्या त्यांच्या या नाळेचा धागा मराठवाड्याशी जुळलेला आहे असे एक दिवस अचानक त्यांनी पाठवलेल्या एका लेखातून लक्षात आले. माझे माई आणि अण्णा हे लेख वाचल्यावर त्यांनीही त्यांच्या वडिलांवर लिहिले. तो लेख मौजच्या दिवाळी अंकात प्रकाशित व्हावा अशी त्यांची इच्छा होती आणि तो लेख तिकडे पाठवण्यापूर्वी त्यांनी तो मला पाठवला. तो लेख आता संपूर्ण आठवत नाही, (आणि तो कुठे प्रकाशित झाला किंवा नाही झाला हेही मला ठाऊक नाही.) पण वाचताना लक्षात आला तो त्यांचे वडील आणि आजी (वडिलांची आई) यांच्यातील बाणेदार आणि लखलखीत पीळ. त्या लखलखीतपणाने मी एकाचवेळी दिपून गेलो आणि अचंबितही झालो. त्यातून धनंजय कुलकर्णी यांची पाळेमुळे तेव्हाच्या अविभाजित परभणी जिल्ह्यात होती हे कळले. अभावग्रस्ततेची ती पार्श्वभूमी आमच्या फोनमैत्रीतील 'कनेक्टिव्हिटी' आणखी भक्कम करून गेली. मराठवाड्याशी त्यांचे एक विलक्षण तरल आणि गतकातर नाते होते, त्या नात्याचा धागा त्यांच्या मनात अगदी स्पष्ट जाणवावा असा बळकट आणि जिवंत होता; याची जाणीव त्यांच्याशी बोलताना कायम होत असे.

मराठी मातृभाषा असली आणि नाळही मराठीशी घट्ट जुळलेली असली तरी त्यांची व्यवहाराची भाषा तेलुगू होती आणि इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून धनंजय कुलकर्णी यांनी पूर्णकाळ नोकरी केलेली होती. इंग्रजीसोबतच तत्त्वज्ञान हा त्यांच्या पदव्युत्तर शिक्षणाचा आणखी एक विषय होता. इंग्रजी आणि तत्त्वज्ञान या विषयांत त्यांनी एम.फिल. केले होते. रक्तगुण जरी मराठी लेखनाचा असला तरी त्यांनी तेलुगूतही भरपूर लेखन केले होते. शिवाय, एक कांदबरी आणि काही कसदार कथा असे त्यांचे तेलुगू भाषेतले अस्सल योगदान आहे. हिंदीवरही त्यांचे प्रभुत्व बोलण्याच्या ओघात येणाऱ्या संदर्भातून सहज जाणवे. यावरून धनंजय कुलकर्णी नावाचा माणूस किती बहुभाषक होता हे स्पष्ट व्हावे आणि आपण थक्क व्हावे! तेलुगू आणि मराठी भाषा तसेच संस्कृती यांच्यातील धनंजय कुलकर्णी जिताजागता दुवा होते, राजदूत होते. मात्र आपण स्वत: असे काही असल्याचा आव त्यांनी कधी आणला नाही. ते त्यांच्या वृत्तीत्तच नसावे.

विपुलता आणि वैविध्य हे त्यांच्या लेखनाचे मुख्य वैशिष्ट्य होते. 'हैदराबादी चित्तरकथा' हे त्यांचे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले. ते मला पाठवायचे त्यांनी कबूल केले होते कारण मी त्यांना अलीकडच्या काळात दैनिक आणि मासिकांचे काही अंक पाठवले, पण त्यांना मला काहीच पाठवता आले नव्हते. त्या पुस्तकाची, एकदा नक्की आपण भेटूयात या परस्परातील अकृत्रिम आश्वासनाची याद कायम जागी असतानाच अचानक कानी आली ती धनंजय कुलकर्णी यांच्या मृत्यूची बातमी. आयुष्यात कधीही न भेटलेल्या या मित्राच्या आठवणी म्हणूनच कातरही आहेत...

**– प्रवीण बर्दापूरकर**


**मूल्य १२० रु**
**सवलतीत ७५ रु.**

# जैन हिल्सवरील जागरण

**भवरलाल जैन**

जळगावचे उद्योगपती भवरलाल जैन यांची 'रॅग्ज टु रिचेस' कथा सर्वपरिचित आहे, परंतु त्यांना अनुभवाच्या ओघात जे शहाणपण आले ते त्यांच्या वेळोवेळच्या भाषणा-मुलाखतींमधून व्यक्त होते. ते परंपराधिष्ठित तर आहेच, पण काळाला अनुरूपही आहे. त्यामुळे समाजाच्या आजच्या बिकट आणि विकल स्थितीत जैन यांचे प्रतिपादन मोलाचे ठरते. त्याची महती अधिक प्रतीत होते ती त्यामधून येणाऱ्या प्रभावी सूत्रवाक्यांनी. विचारसरणीच्या अभावाच्या सद्यकाळात त्या सूत्रवाक्यांना तत्त्वविचाराचा मोठेपणा लाभतो...

# ब्रँडन टीना

## अपर्णा पाटील

पिंकी प्रामाणिक भारताची खेळाडू. एका छोट्याशा खेड्यातून आलेली. देशासाठी खेळताना पदकांच्या कमाईचं स्वप्न पाहणारी. एका अपघातामुळे तिला खेळापासून दूर जावं लागलं आणि देशातल्या तमाम क्रीडाप्रेमींनाही तिचा काही वर्षांत विसर पडला. एके दिवशी, एका महिलेनं पिंकी प्रामाणिक ही स्त्री नाही, तर पुरुष आहे. माझ्यावर त्यानं अनेकदा बलात्कार केल्याचं जाहीर करून पोलिसांत धाव घेतली. पुरावा म्हणून पोलिसांना मोबाइलमधली छायाचित्रंही दाखवली. पोलिसांनी ती छायाचित्रं पत्रकारांसमवेत पाहिली. या प्रकरणात नंतर पिंकीला अटकही झाली. पण अटकेनं अनेक प्रश्न उभे केलेत. आतापर्यंत महिला खेळाडू म्हणून तिनं केलेल्या कामगिरीचं काय? हा फक्त हार्मोनल बदल आहे की निव्वळ फसवणूक? खेळाडू असताना झालेल्या असंख्य चाचण्यांच्या वेळी कसं कळलं नाही की ती महिला नाही? बलात्काराचा आरोप केलेल्या महिलेनं आजवर तिच्याशी ठेवलेल्या शरीरसंबंधांना नेमकं म्हणायचं तरी काय? यांसारखे असंख्य वादग्रस्त प्रश्न या प्रकरणानं उभे केले. या प्रकरणामुळे अमेरिकेतल्या ब्रँडन टीनाची आठवण झाली.

ब्रँडन टीना ही काही पिंकीप्रमाणे देशासाठी खेळणारी खेळाडू किंवा लोकप्रिय व्यक्तिमत्त्व नव्हती. तिच्या एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात ती कधी आपला परिसरही सोडून बाहेर गेली नव्हती. तरीही देशभरात, जगभरात ब्रँडन टीनाची कहाणी अनेकदा चर्चेला येत राहिलीय. स्त्री म्हणून जन्माला येण्याची आणि स्त्रीत्व नाकारण्याची फार मोठी किंमत तिनं मोजली. समाज, पोलिस आणि पत्रकार यांनी कदाचित तिचं असणं, जगणं समजून घेतलं असतं तर ती आज जिवंत असती, अशी रूखरूख वाटणारी व्यक्तीही तिच्या आयुष्यात नाही, हीच तिची मोठी शोकांतिका ठरली.

अमेरिकेतल्या या टीनाची कहाणी अनेकांनी पडद्यावर पाहिली ती 'बॉइज डोण्ट क्राय' नावानं आलेल्या सिनेमातून. १९९९मध्ये आलेल्या या सिनेमात ब्रँडन टीना साकारणारी अभिनेत्री हिलरी स्वँन्क ही ऑस्कर सोहळ्यात सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली. तेव्हाही पुन्हा एकदा ब्रँडन टीनाचं काय झालं, याची चर्चा झाली. त्याआधी आणि त्यानंतर ब्रँडन टीना हे नावं उच्चारणं वादळी ठरत गेलं. अमेरिकेच्या इतिहासातलं ब्रँडन टीना हे अत्यंत गाजलेलं, वादग्रस्त आणि तितकंच खळबळजनक असं प्रकरण ठरलं.

ब्रँडन टीना नावानं ओळखल्या जाणाऱ्या या तरुणीचं मूळ नाव होतं टीना ब्रँडन. नेब्रास्कातील लिंकन शहरात वावरताना तिची स्त्री म्हणून ओळख कायम होती. पण तिला हे नको होतं, म्हणून तिनं शहर बदललं. स्वतःला हवं तसं जगण्याची ओढ तिला होती आणि ही छोटीशी गोष्ट तिचा दुःखद अंत घडवून आणणारी ठरली. एका छोट्या गुन्ह्यात पकडल्या गेलेल्या ब्रँडन टीनाची खरी ओळख पोलिस आणि पत्रकारांनी उघड केली आणि तीच गोष्ट तिचा अत्यंत भयावह असा शेवट घडवून आणणारी ठरली.

१९७२ मध्ये टीना रेनाई ब्रँडन नावानं जन्मलेली टीना जन्माला येण्यापूर्वीच तिचे वडील कार अपघातात मरण पावले होते. आई, मोठी बहीण टॅमी आणि टीना या सगळ्यांना आजोळी राहावं लागलं. तिची आई एका रिटेल स्टोअरमध्ये काम करून घरगाडा चालवत होती. अशा परिस्थितीत सापडलेल्या मुलींचा फायदा घेणारे अनेक असतात. टॅमी सहा वर्षांचीही झाली नव्हती आणि टीना तर तीन वर्षांचीही, त्यावेळी दोघींनाही आपल्याच नातेवाईकाच्या लैंगिक छळाला सामोरं जावं लागलं. टीनाच्या मनावर त्याचा इतका परिणाम झाला की, नंतरच्या आयुष्यात तिला मनोचिकित्सकाकडे न्यावं लागलं होतं.

सगळं बालपणच अस्वस्थपणात, अस्थिरतेत जाण्याचा परिणाम व्हायचा तो झालाच. हे सगळं वातावरण तिच्यात मानसिक उलथापालथी घडवून आणत होतं. टीनाच्या मनावर झालेले परिणाम इतके गहिरे होते, की वेगळीच टीना तिच्यात आकार घ्यायला लागली. अशातच तिच्या आईनं लग्न केलं. व्यसनी पतीमुळे कौटुंबिक कलह सुरू झाले. त्या गोष्टीनं टीनासह सगळ्यांनाच हलवून सोडलं होतं. उघडपणे बंडखोरी करत जगणं तिला जमलं नाही, पण शांत राहून तिनं आपल्या आयुष्यातल्या संघर्षाची धग धुमसत ठेवली. लहानपणी झालेल्या लैंगिक छळामुळे किंवा सतत पुरुषीवर्चस्वाला बळी ठरण्याच्या प्रसंगामुळे टीना आपण मुलगी आहोत, हीच गोष्ट नाकारायला लागली. तिनं पुरुषांप्रमाणे राहायला, वावरायला सुरुवात केली. इतकंच नाही तर तारुण्याच्या उंबरठ्यावर पोचलेल्या टीनानं वर्गमैत्रिणींबरोबर डेटिंग केलं. तिच्या आईला हे पसंत नव्हतं. तिनं कायमच टीनाला



**ब्रँडन टीना आणि लीना**

मुलगी म्हणून संबोधलं होतं. टीना मात्र सतत सगळं नाकारत होती.

टीना आणि तिची मोठी बहीण टॅमी दोघीही सेंट मेरीज एलिमेंटरी स्कूल अँड पायस हायस्कूलमध्ये जात. वयानुरूप होणारे बदल तिच्यात होत होते. शरीर आणि मन या तिढ्यात अडकलेल्या टीनातली बंडखोरवृत्ती उफाळून यायला लागली. ख्रिस्ती धर्मातील समलैंगिकतेविषयी असलेली मतं तिला पटणारी नव्हती, म्हणून तिनं धर्मालाच उघडपणे नाकारायला सुरुवात केली. पण याचा अर्थ तिला समलैंगिकता मान्य होती, असं नाही. तर तिला आपलं स्त्रीपण मान्य नव्हतं. ती पुरुषी कपड्यांमध्ये कायम वावरायची. यामुळे तिच्यातल्या सुप्त भीतीला पुरुषी कपड्यांचं उबदार आवरण मिळत होतं. स्त्री म्हणून आपलं कोणीतरी दमन करत राहिलंय, या विचारानं अस्वस्थ झालेल्या टीनाला पौरुषत्व हवं होतं, कारण तीच गोष्ट तिला मानसिक स्वस्थता मिळवून देणारी होती. तारुण्यात पदार्पण केलेल्या टीनाला लष्करात जावंसं वाटायला लागलं ते त्यामुळेच. ती पुरुषीपणानं पछाडली होती. लष्कराच्या पूर्वपरीक्षा अर्जावर आपण पुरुष असल्याचं लिहिण्याचं कारणही तेच होतं. मात्र पुरुष आहे, असं लिहिल्यानं तिची तीही संधी हुकली.

वारंवार असं नाकारलं जाण्यानं आपण पुरुष आहोत, हे दाखवण्याचा टीनाचा अट्टहास अधिक प्रबळ होत गेला. आपल्या शरीराचे उभार दिसू नयेत, याची काळजी ती घ्यायला लागली. मुलींबरोबर डेटला जाण्याची धडपड करायची. त्यासाठी वर्ग बुडले तरी ती त्याची पर्वा करत नव्हती. या सगळ्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. तिची अभ्यासातली प्रगती एवढी घसरली की तिला शाळेबाहेरचा रस्ता दाखवला गेला.

काम करून पोट भरण्याचा मार्ग शोधायचा होता म्हणून एका पेट्रोलपंपावर काम करायला लागली. त्यानंतर हिथर या मैत्रिणीबरोबर उघडपणे डेटिंग करणं, तिचं पुरुषी मानसिकता स्वीकारण्याचं नवं पाऊल होतं. दोघांच्या मैत्रीला अफेअर म्हणावं का, असा प्रश्नच होता. पण टीना स्वतःला पुरुष म्हणवून घेत होती. टीनानं दोघांसाठी एक ट्रेलर होमही घेतलं. या सगळ्या गोष्टी टीनाच्या आईला समजण्यापलीकडच्या होत्या.

काही दिवसांनी एका छोट्याशा कारणानं टीनाला फॉल्स सिटीला स्थलांतरित व्हावं लागलं. या नव्या शहरात प्रवेश करताना तिनं आपल्यातलं स्त्रीत्व कायमचं झुगारून टाकलं. पहिल्या दिवसापासूनच तिनं पुरुष म्हणून वावरायचं ठरवलं. पुरुषीअड्डे आणि काळजी नसलेलं आयुष्य जगायला लागली.

काही दिवसांतच तिनं मित्रमैत्रिणी जमवल्या. अशाच ओळखीतून तिला लिसा लँबर्टच्या घरात राहायला जागा मिळाली. तर जॉन लॉटर आणि मार्विन नेसन, ब्रँडन बनलेल्या टीनाचे सच्चे दोस्त बनले. लाना टीस्डेलसोबत डेटिंग करणारी टीना एका प्रकरणात अडकली. हेच प्रकरण पुढे टीनाच्या जीवावर बेतलं.

हॉटेलचं बिल भरण्यासाठी भरलेला चेक वटला नाही आणि फसवणूक प्रकरणात पोलिसांनी ब्रँडन टीनाला अटक केली. लाना जामीन भरण्यासाठी गेली तेव्हा ब्रँडनला महिलांच्या कारागृहात ठेवलेलं तिनं पाहिलं. ते पाहून लानानं सत्य काय ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आपण लवकरच लिंगबदल करून घेणार आहोत, असं सांगून ब्रँडन टीनानं वेळ मारून नेली होती. पण लानाला जी गोष्ट सांगितली नाही त्या गोष्टीचा गावगन्ना झाला होता. फॉल्स सिटीच्या स्थानिक वर्तमानपत्रात, पुरुष म्हणून वावरणारा ब्रँडन हा स्त्री असल्याचं नावानिशी छापलं गेलं. लानानं ब्रँडनची बाजू समजून घेतली, तरी त्या गावातल्या प्रत्येकालाच ते जमलं नाही.

आपण ज्याला आजवर आपला मित्र मानत होतो, आपल्या आयुष्यातल्या अनेक गोष्टी, सुखदुःख वाटून घेतली, त्यानं आपली फसवणूक केल्याची ठाम धारणा झाली ती ब्रँडनच्या मित्रांची, विशेषतः जॉन आणि मार्विनची. त्याच भावनेमुळे ब्रँडनविषयी त्यांच्या मनात घृणा निर्माण झाली होती.

दुसरीकडे, जेलमधून सुटका झाल्यानंतर आपली खरी ओळख उघड झालेल्या ब्रँडनची अवस्था वाईट झाली होती. प्रत्येकजण त्याच्याकडे संशयाच्या नजरेनं पाहत होता. जेलमधून सुटका होऊन फक्त सहा दिवस झाले होते. नाताळनिमित्त घरोघरी पार्ट्या झडत होत्या. पण ब्रँडनच्या आयुष्यात नव्या वर्षाची सकाळ उगवणारच नाही, असे संकेत दिसत होते.

ब्रँडन हा खरोखरच स्त्री आहे, हे

लानाला दाखवून देण्यासाठी जॉन आणि मार्विन नाताळच्या दिवशी घरी आले. लानासमोरच ब्रँडनला कपडे उतरवायला लावले. त्या दोघांचा आवेश पाहून लाना इतकी घाबरली की तिनं मानही वर केली नाही. त्यामुळे चिडलेल्या दोघांनी ब्रँडनवर अत्याचार करायला सुरुवात केली. त्यानंतर दोघांनी ब्रँडनला आपल्या कारमध्ये खेचून आणत, रिचर्डसन काऊंटीतल्या एका मांस पॅकिंग कंपनीत नेलं. दोघांनी तिच्यावर पाशवी बलात्कार करून मारहाण केली. एवढं करून ते थांबले नाहीत तर, या गोष्टीची वाच्यता केलीस तर जीवे मारण्याची धमकीही दिली. त्यानंतर मार्विनच्या घरी ब्रँडनला नेण्यात आलं. पण तिथून निसटलेल्या ब्रँडननं लानाचं घर गाठलं. असहाय्य टीना या प्रकारानं कोलमडून गेली नसती तरच नवल.

ह्या सगळ्या प्रकरणात लाना मात्र तिच्याबरोबर होती. पोलिसांत जाण्यासाठी तिला राजी केलं. पोलसी खाक्या जिथेतिथे सारखाच. पोलिस स्टेशनात पोचलेल्या टीनावर पोलिसांनी नको त्या प्रश्नांची सरबत्ती करताच तिला ते सारं नको वाटायला लागलं. ती एक स्त्री आहे, तिच्यावर बलात्कार झाला आहे, हे गोष्ट संवेदनशीलतेनं हाताळणं आवश्यक होतं. पण तसं टीनाच्या बाबतीत झालं नाही. तिच्यावरच्या अत्याचारापेक्षा तिचं लैंगिक रहस्य जाणून घेण्यात पोलिसांनी रस घेतला होता. तरीही आपल्यावर बलात्कार, अत्याचार करणाऱ्याची नावं तिनं पोलिसांना सांगितली. किमान त्यांच्यावर पोलिस काही तरी कारवाई करतील, अशी अपेक्षा तिला होती. पण तसं झालं नाही आणि झालं तेव्हा मात्र खूप उशीर झाला होता. चौकशी करून टीनाला घरी पाठवण्यात आलं, त्यावेळी जॉन आणि मार्विन शांत बसणार नाहीत, याची खात्रीच तिला झाली होती. पोलिसांनी मात्र त्यांना पकडण्याची तत्परता दाखवली नाही. उलट, टीनानं पोलिसांना आपली नावं पोलिसांना सांगितल्याचं त्यांना समजलं. पोलिसांनी त्यांना पकडलं, पण पुरावे पुरेसे नाहीत म्हणून सोडून दिलं. दोघांनाही ब्रँडन टीनाला कायमचं शांत करण्याची घाई लागली.

जॉन आणि मार्विननं टीनाचा ठाव-ठिकाणा शोधून काढायला सुरुवात केली. टीना सतत आपल्या राहण्याच्या जागा बदलत कहोती. सहा दिवसांनी ती दोघं लॅम्बर्टच्या घरात पोचले तेव्हा टीना तिथे असणार याची खात्री पटल्यानंतर. लॅम्बर्टला झोपेतून उठवून टीना कुठे आहे, हे विचारलं. तिनं काहीही उत्तर दिलं नाही, पण लॅम्बर्टनं फिलीप डेव्हिडला विचार असं सांगितलं. डेव्हिड हा लानाच्या बहिणीचा मित्र होता. पिसाटलेल्या त्या दोघांनी शोधाशोध केली तेव्हा घरात टीना दिसल्यावर भडकलेल्या त्या दोन माथेफिरूंनी आधी लॅम्बर्ट, मग फिलीपचा बळी घेतला. टीनालाही गोळ्या घालण्यात आल्या. मेली की नाही, याची खात्री करून घेण्यासाठी चाकूनं भोसकण्यात आलं.

टीनाची अखेर इतक्या क्रूर पद्धतीनं झाल्यानंतरही दोघांना जराही पश्चात्ताप झालेला नव्हता. टीनानं आपण स्त्री आहोत हे लपवून, त्यांच्या भयंकर फसवणुकीचं केलेलं ते जणू प्रायश्चित्त होतं. तसा दावाही दोघांनी वारंवार कोर्टात केला. कोर्टात आपण बलात्कार केलाच नाही, तर कधी फक्त बलात्कारच केला, असा युक्तिवाद दोघं करत राहिले. वाद-प्रतिवाद होत अखेर दोघांना शिक्षा झाल्यानंतर ब्रँडन टीनाचा दोष नेमका काय, हा प्रश्न अनेक वादळं निर्माण करत राहिला. अपिलांवर अपीलं होऊन या प्रकरणाचा निकाल लागला तेव्हा फक्त कायदेशीर शिक्षा झाली. न्याय झालाच नाही...

ब्रँडन ही जन्मानं स्त्री होती, मात्र पुरुषीवेशात वावरत होती, शिवाय ती डेटिंग करत होती, ही बाब आरोपींना खटकली होती. त्यातूनच त्यांनी तिच्यावर बलात्कार केल्याचं तिनं सांगितलं होतं. पण पोलिसांनी या गोष्टीला फार गंभीरतेनं घेतलं नव्हतं. बलात्कार झाल्याचं तिनं पोलिसांना सांगितलं म्हणून चिडलेल्या त्या दोघांनी अत्यंत शांतपणे तिच्या खूनाचा कट आखला. ब्रँडनला ठार करण्यासाठी त्यांनी कारनं परिसर पिंजून काढला होता. त्यांच्या गाडीत दोरी आणि बदलण्यासाठी कपड्यांचे जोडही होते, याचाच अर्थ ते हिंसक पद्धतीनं तिचा शेवट करणार हे ठरवूनच गेले होते.

बलात्कार झाल्यानंतर पोलिसांकडे गेलेल्या टीनाला पोलिसांचा अनुभव आला तो तिच्या मृत्यूनंतर फार बदलेला नव्हता. पोलिसांनी त्या दोघांना पकडलं. तरीही पोलिस त्यांच्यावर गुन्हे दाखल करताना बलात्कार आणि मारहाणीचा उल्लेख करायलाही धजावत नव्हते.

ब्रँडनचा खून हे जितकं खळबळजनक प्रकरण होतं, तितकीच या प्रकरणाची कोर्टकेसही. अनेक अपीलं या प्रकरणात करण्यात आली. कारण प्रत्येकवेळी आरोपींना पुराव्यांच्या अभावाचा, परिस्थितीचा फायदा मिळत जात होता. बराच पैसा अपिलांमध्ये खर्च होत राहिला. पण टीनाच्या आरोपींना मिळालेली शिक्षा ही कमी होती.

१९९३ मध्ये एका टीनाचा झालेला शेवट हा वीस वर्षांनंतरही वादळी चर्चेचा विषय ठरतो. आज या प्रश्नाला वेगवेगळे संदर्भ, दृष्टिकोन लाभलेत. ब्रँडन टीनाच्या नावानं आज अनेक संस्था लेस्बियन, ट्रान्स जेंडर व्यक्तींसाठी महत्त्वाचं काम करताहेत. तिच्यावरील डॉक्युमेंटरी, सिनेमा पाहून तिचं जगणं समजून घेता येतं. पण एकवीस वर्षांच्या छोट्याशा आयुष्यात इतकी मोठी वादळं पचवत टीनाचं ब्रँडन म्हणून तिला कधीकाळी जगणं नाकारलं गेलं होतं. त्यावेळी पोलिस, प्रशासन, कुटुंब कोणाचीच साथ तिला मिळाली नाही.

पोलिसांनी ब्रँडन टीना एक स्त्री असून पुरुष म्हणून वावरतेय, याची माहिती पत्रकारांना दिली होती. पेपरमध्ये ही गोष्ट मोठ्या चटकदारपणे छापण्यात आली. त्यानंतर तिच्यावर बलात्कार आणि नंतर खून झाला. कदाचित पोलिस आणि पत्रकारांनी तिचं असणं, जगणं समजून घेतलं असतं तर टीना आजही जिवंत असती.

**अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# आर. के. लक्ष्मण – एक ‘कॉमन मॅन’

**प्रभाकर वाईरकर**

हवीहवीशी वाटणारी व्यक्ती अचानक समोर आली तर आपण एकदम बावचळून जातो. त्या व्यक्तीला भेटू की नको, तिला काय वाटेल, आपल्या भेटीनं त्या व्यक्तीला आनंद होईल का? त्या व्यक्तीकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही तर...? असे प्रश्न पडतात. त्यातही ती व्यक्ती आजारी असल्यास अशा विचारांचा कल्लोळ आपल्या मनात होत असतो. माझ्या मनाची अशीच काहीशी अस्वस्थता ‘त्या’ दिवशी झाली.

व्हीलचेअरवरून आर.के. लक्ष्मण यांचं आगमन त्यांच्याच राहत्या बिल्डिंगच्या कंपाउंडमध्ये झालं. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी, सून, नात वगैरे नातेवाईक होते. ते जसजसे कार्यक्रमाच्या ठिकाणी पुढे येत होते तशी माझ्या मनाची स्थिती वर उल्लेखल्या–प्रमाणे होत होती. मला काहीच सुचेना. त्यांना भेटू की नको? मी त्यांच्याकडे तसाच एकटक पाहत स्तब्धपणे उभा होतो.

कु. शौर्य महानोत, वय वर्षे ५, राहणार मध्यप्रदेश, याचा सत्कार आर.के. लक्ष्मण यांच्या हस्ते करण्याचं आयोजन केलं होतं. हा मुलगा अतिशय विश्वासपूर्वक मोठ्या कॅनव्हासवर ॲक्रेलिक रंगानं अमूर्त चित्रं काढतो व त्याच्या प्रात्यक्षिकाचा कार्यक्रम लक्ष्मण यांच्यासमोर साजरा झाला.

माझं संपूर्ण लक्ष लक्ष्मण यांच्यावर केंद्रित झालं होतं. त्यांची प्रतिक्रिया, चेहऱ्याचे हावभाव कसे होतात यावर लागलं होतं. ते त्या मुलाला हातानं वा नजरेनं दाद देत होते. त्यांची तब्येत चांगली नसूनही, त्यांच्याकडे पाहून असं वाटत होतं की




प्रभाकर वाईरकर आणि आर.के. लक्ष्मण

त्यांनाही वाटत असेल... आपणही असेच ब्रशचे फटकारे आताच मारू, अगदी मनसोक्त. पण ते शक्य नाही याचीही त्यांना जाणीव...

काही वेळानं शौर्यच्या सत्काराचा कार्यक्रम सुरू झाला. त्या मुलाचा सत्कार लक्ष्मण यांच्या हस्ते झाला. त्यानंतर त्या मुलाचा सत्कार मीही करावा असं त्याच्या वडिलांनी मला सांगितलं. त्याची पूर्वकल्पना त्यांनी मला दिली होती. त्यासाठी मी अगोदरच तयार केलेलं एक व्यंगचित्र ‘कॉमन मॅन आणि शौर्य’ त्याला मी भेट म्हणून दिलं. त्याच्या सत्काराच्या निमित्तानं आर.कें.ना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मला मिळणार असल्यानंच मी, शौर्यचा माझ्याही हस्ते सत्कार व्हावा या त्यांच्या विनंतीला तयार झालो होतो.

आता मला केव्हा एकदा आर.के. लक्ष्मण यांच्याशी संवाद करतो असं झालं. मी त्यांना देण्यासाठी तयार केलेलं एक व्यंगचित्र सोबत नेलं होतं. ते त्यांना भेट म्हणून दिलं. विषय होता 'The common man's family'. श्री. लक्ष्मण, सौ. लक्ष्मण व दोघांच्या मध्ये बसलेलं त्यांचं ‘अपत्य’ कॉमन मॅन असं ते चित्र होतं.

त्यांना ते खूप भावलं. ते पाहत राहिले त्यांच्या कुटुंबासह आणि हातानं ‘छान’ अशी खूण करून मला नजरेनं शाबासकी दिली, हे मला जाणवलं. अत्यानंद झाला. आणखी एक भेट म्हणून मी माझी दोन पुस्तकं त्यांना दिली आणि त्यांच्याकडून काय प्रतिक्रिया येते याची प्रतीक्षा करू लागलो. हातामध्ये नीट पकडता येत नव्हतं तरी एका हातानं ते पुस्तक उघडून त्यातील व्यंगचित्रं पाहण्याचा मोह त्यांना आवरता येत नव्हता. मी मनातून सुखावत होतो की माझी व्यंगचित्रं जागतिक ख्यातीचा एक



महान पुरुष पाहत आहे. पहिलं पुस्तक पाहिल्यानंतर ते माझं दुसरं पुस्तक पाहू लागले. त्यासाठी ते प्रत्येक पान उघडण्याचा प्रयत्न करत होते. माझं लक्ष गेलं. पुस्तक मोठं असल्यानं त्यांना ते नीट हाताळता येत नव्हतं. मी पुढे गेलो आणि प्रत्येक पान उघडून त्यांना ती व्यंगचित्रं दाखवू लागलो. संपूर्ण पुस्तक अगदी एखाद्या विद्यार्थ्यासारखं त्यांनी पाहून काढलं आणि पुन्हा सहजपणे त्यांनी तीच हातानं सुंदर वा सुरेखची खूण करून दाखवली. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही.

मध्येच वळून ते आपल्या पत्नीकडे (सौ. कमलाजी) पाहत त्यांना हाताच्या खुणेनं बाजूला ठेवलेलं, मी काढलेले त्यांचं व्यंगचित्र दाखवत होते, 'ते' पाहा. कारण त्या व्यंगचित्रामध्ये सौ. लक्ष्मण यांचं कॅरिकेचर होतं. तो क्षण मी कधीच विसरू शकत नाही. मी तरी कधी सौ. लक्ष्मण यांचं कॅरिकेचर पाहिलेलं नाही. बहुधा ते दुर्मिळ असावं म्हणून त्यांना ते दाखवण्यात एक वेगळाच आनंद वाटत असावा.

एका महारथीनं माझ्या व्यंगचित्राची स्तुती न बोलता नजरेतून व खुणेनं करून, आपल्या पत्नीलाही त्यात सहभागी करून घेण्याचा तो माझ्या जीवनातला दृष्टीनं अतिमौल्यवान प्रसंग आहे.

त्यांच्या आजारपणाच्या अगोदरही श्री. लक्ष्मण यांना भेटणं दुरापास्तच असे. नशिबानं भेट झाली तरच. पण असा क्षण माझ्या व माझ्या कुटुंबाच्या नशिबी २००२ साली हैदराबाद इथं घडून आला. 'Eminant Cartoonist of India' ही डॉक्युमेंटरी १२/१३ भारतीय नावाजलेल्या व्यंगचित्रकारांवर बेतली होती. त्यातील सर्व व्यंगचित्रकारांना आंध्रप्रदेश सरकारनं गौरवलं. त्यामध्ये मारियो मीरांडा, आर.के. लक्ष्मण, बापू, उन्नी, मी , सुरेश सावंत, विन्स व इतर व्यंगचित्रकारांना त्यांच्या फॅमिलीसहित आमंत्रित केलं गेलं होतं.

ते चार दिवस आम्ही सर्व एकत्र होतो. तसे लक्ष्मण हे मूडीच. ते कोणाशी जास्त संपर्क ठेवून नसतच. म्हणजे त्यांना भेटणं, चर्चा-गप्पागोष्टी करणं अशक्यच.

परंतु त्या चार दिवसांत लक्ष्मणजी सर्वांमध्ये मिळून-मिसळून, विनोद करत होते. आपल्या आयुष्याबद्दल बोलणं, व्यंगचित्र-कलेसंदर्भात गमती, आपण व्यंगचित्र कसं काढतो इथपर्यंत खुलून बोलत होते. त्यांनी माझ्यासोबत आलेल्या माझ्या छोट्या मुलाला विनोद व काही गेम्स कसे खेळावेत हेही शिकवले. क्रेझी बॉलचे प्रात्यक्षिक करून दाखवले!

श्री. लक्ष्मण हे व्यंगचित्रं कशी काढत असतील, त्यांचं वाचन, कल्पना व ड्रॉईंगची पद्धत कशी असेल याबद्दल अनेक वर्षं जाणून घेण्याची खूप उत्सुकता होती व ती आंध्रच्या दौऱ्यात अकल्पित पुरी झाली. आर.के. त्या दिवशी खूप मूडमध्ये होते. आम्ही व्यंगचित्रकार व आमचे कुटुंबीय त्यांच्याबरोबर घोळका करून होतो. अचानक त्यांनी व्यंगचित्रांबद्दल बोलायला सुरुवात केली. ''मी दररोज ॲम्बेसेडर गाडीमधून सकाळी नऊ वाजता 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये येतो. माझ्या केबिनमध्ये बसल्यावर दुपारी तीन वाजेपर्यंत सर्व वर्तमानपत्रे वाचून काढतो. माझ्या केबिनमध्ये वा हातावरही घड्याळ नसते. कधी वाटलेच तर मी शिपायला विचारतो, किती वाजले... तीनच्या नंतर व्यंगचित्राची कल्पना तयार करून संपूर्ण व्यंगचित्र पाचपूर्वी तयार करतो. कधी कधी त्या व्यंगचित्राला आवश्यक असलेली कॅप्शन माझ्या टीमकडून तयार करवून घेतो.'' हे ऐकून मी आश्चर्यचकित झालो. व्यंगचित्रकार आपल्या व्यंगचित्रा-साठी इतरांची मदत घेतात, पण त्यासाठी त्यांची एक 'टीम' असते हे मला माहीत नव्हतं.

अशा अनेक गप्पा. लक्ष्मण यांचा स्वभाव कडक, वेळेचं भान राखणारा. वेळेचं भान ज्याला नसेल तर ती व्यक्ती त्यांच्या ब्लॅक लिस्टमध्येच... असाच प्रसंग हैदराबादला रामोजी फिल्मसिटीमध्ये घडला. रामोजी फिल्मसिटीनं आम्हा सर्व व्यंगचित्रकारांना खास पाहुणे म्हणून निमंत्रित केलं होतं व त्यांचा संपूर्ण स्टुडिओ त्यांनी आम्हाला गाडीमधून फिरवून दाखवला. ते पाहत असताना

सर्कसमध्ये जसे प्रकार असतात तसे प्रकार दाखवण्यासाठी आम्हाला एका छोट्या थिएटरमध्ये नेण्यात आलं. आम्ही सर्व गोलाकार पायऱ्यांवर होतो. लक्ष्मणही मारियो मिरांडांसोबत बसले होते. काही विनोद चालू होते. पाच-दहा मिनिटं झाली खेळ काही चालू होईना. लक्ष्मण यांची चुळबूळ चालू झाली व ते खुणेनं सर्वांना सांगू लागले, चला-निघुया. पण काही जणांना उठवेना. आणखी पाच-सात मिनिटं गेली. खेळ चालू व्हायची लक्षणं दिसत नव्हती. क्षणाचाही विलंब न करता लक्ष्मणजी ताडकन उठले व थिएटरच्या बाहेर पडले. काय करणार? सर्वांचे चेहरे पडले. पण त्यांना पाठिंबा न देणं म्हणजे त्यांचा अपमान करणं या जाणिवेनं सर्वजण शेळीच्या कळपाप्रमाणे एकामागोमाग एक बाहेर पडले.

आज तेच आर.के. लक्ष्मण अनेक वर्षांनी मी अगदी जवळून अनुभवत होतो. कसलीच घाई नव्हती. सर्वांना भेटत होते. त्यांच्या भावना समजून घेत होते, अगदी निरागस मुलाप्रमाणे. हीच संधी साधून मी माझ्या मुलाची त्यांच्याशी ओळख करून दिली व तुम्ही याच मुलाशी हैदराबादला खेळला होतात याची आठवण त्या दोघांनाही करून दिली. सौ. लक्ष्मण यांच्या त्या आठवणी जाग्या झाल्या. सर्व आठवले म्हणत त्यांनी दाद दिली आणि मुलाचं कौतुक केलं.

आधी म्हटल्याप्रमाणे, ते माझी सर्व कार्टून्स पाहत होते. अगदी मन लावून. खरं म्हणजे हे माझे 'ऑस्करच.' तेव्हा सतत विचार येत होते, की त्यांना आता वाटत असेल की मी व्यंगचित्रं काढू शकत नाही. एकेकाळी मी सर्व राजकीय दिग्गजांना सळो की पळो करून सोडलं...


एकदा बाळासाहेब ठाकरेही माझ्याशी बोलताना म्हणाले होते, ''अरे याच हातानं मी ब्रशचे फटकारे असे मारलेत की... पण आज मी साधी सहीही करू शकत नाही.''

आजचे लक्ष्मणजी बघताना वाईट तर वाटले, पण हेही वाटले, कालाय तस्मै नम:

अशाच गप्पा होत असताना मी सहज सौ. लक्ष्मण यांना 'ड्रीम टू रियालिटी' ह्या आर.के. लक्ष्मण यांचा मुलगा श्रीनिवास लक्ष्मण यांनी माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकाची आठवण करून दिली व त्यातील सर्व ५० वास्तववादी चित्रं काढली तो चित्रकार मीच आहे असं सांगितल्यावर सौ. लक्ष्मण यांचे डोळे चमकले आणि त्या म्हणाल्या की आम्ही त्याच चित्रकाराच्या शोधात होतो व तो चित्रकार कोण ते पाहायचं होतं. लगेच त्यांनी आपल्या सुनेला हाक मारून बोलावलं व म्हणाल्या, ''अगं, मी तुला अशा माणसाशी ओळख करून देते की ज्यानं ड्रीम टू रियालिटी या पुस्तकासाठी चित्रं काढलीत.'' सौ. उषा यांना मला भेटून खूप आनंद झाला. अशा या प्रत्यक्ष अनुभवामुळे माझ्यावर मूठभर मांस चढल्याचा मला भास झाला. कारण लक्ष्मणजींची पत्नीही तेवढ्याच उच्च कोटीतीली!

हे सर्व अनुभवल्यानंतर वाटले, खरा कलावंत कधीच हार पत्करत नसतो. कितीही वाईट प्रसंग आले तरीही तो स्वत:ला व्यक्त करतो. त्यांच्या हातवाऱ्यातून, स्पर्शातून, चमकदार नजरेतून वा दुसऱ्याच्या कलेचा निर्भेळ आनंद घेण्यातून.

**प्रभाकर वाईरकर**
prabhakarwairkar@rediffmail.com




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १५० रु.**

## २१ जुलै रोजी प्रसिद्ध होत आहे!

# आठवणीतील पाऊले

## डॉ. बापुसाहेब रेगे

मूल्यशिक्षणातून संस्कारक्षम विद्यार्थी घडतात आणि तेच देशाचे भवितव्य घडवतात या भूमिकेतून दादासाहेब रेगे या शिक्षणमहर्षींनी आयुष्यभर कार्य केले. त्यांनी स्थापन केलेल्या 'बालमोहन' शिक्षणसंस्थेची मुद्रा, तिच्या स्थापनेपासूनचे साक्षीदार असलेल्या त्यांच्या सुपुत्राने, डॉ. बापुसाहेब रेगे यांनी, ती अधिक तेजस्वी केली. औपचारिक शिक्षणासह जीवनशिक्षणाचे बाळकडू पित्याकडून लाभलेल्या बापुसाहेबांनी त्यांच्या सात्त्विक, संयमी आणि आस्थेवाईक स्वभावाने शिक्षणक्षेत्रात आपली मोहोर उमटवली. तसेच, सतत विद्यार्थ्याच्या भूमिकेत राहून विविध क्षेत्रांत रस घेतला. त्यांच्या जीवनप्रवासाच्या या आठवणी, त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याची प्रेरणा देणाऱ्या...

# 'सेवालय'
# एका प्रार्थनेची गोष्ट

**शर्मिष्ठा भोसले**

चिमणीसारखी असलेली चिमणी, विश्वास, गायत्री, अनिकेत, सोनाली, अक्षय ....सारेजण डोळे मिटून प्रार्थना म्हणत असतात. त्यांना पाहून इकडे कितीही प्रयत्न केले तरी माझे डोळे मात्र पुन:पुन्हा भरून येतात! ओळखीच्या त्या शब्दांमागे दडलेले वेदनेचे अर्थ कमालीचे अस्वस्थ करत जातात.

चिमणी, धीरज-वय वर्षे सहा, विश्वास वय वर्षे सात, गायत्री-वय वर्षे आठ आणि इतर अठरा जण. 'सेवालया'त एकूण पंचवीस मुलेमुली आहेत. ती सारी चिमुरडी HIV+ आहेत. रवी बापटले यांनी त्या निष्पाप जिवांचे मायबाप होत, त्यांची शैक्षणिक-सामाजिक जबाबदारी उचलत स्वत:ला 'सेवालय' प्रकल्पास वाहून घेतलेले आहे. हा माणूस 'दैनिक संचार' या वृत्तपत्राचे जिल्हा प्रतिनिधीपद आणि एमआयटीसारख्या नामांकित महाविद्यालयातील प्राध्यापकी सोडून चार वर्षांपासून 'सेवालय'च्या माध्यमातून मुलांसाठी काम करतोय.

याबाबत विचारले असता बापटले सहजपणाने सांगू लागतात, की प्राध्यापक म्हणून काम करत असताना, काही विद्यार्थ्यांना सोबत घेऊन ३० मार्च २००६ रोजी आम्ही सेवक अभियान सुरू केले होते. त्यामध्ये आम्ही पहाटे पाच वाजल्यापासून आठ वाजेपर्यंत लातूर शहरात स्वच्छता मोहीम राबवली. सव्वा वर्षे चाललेल्या त्या मोहिमेत आम्ही स्वच्छता, जनजागृती, तातडीचे रक्तदान शिबिर असे उपक्रम राबवले. शासनाकडून लातूरला स्वच्छतेचे प्रथम पारितोषिक त्या वर्षी मिळाले. त्या दरम्यान, माझे गाव धोंडीहिप्प रगा येथे दुर्घटना घडली. मुंबईस वेठबिगारी करणाऱ्या जोडप्याचा मुलगा उपचारांअभावी HIV+मुळे वाईट अवस्थेत मरण पावला. गावकऱ्यांनी अज्ञान अन् अंधश्रद्धा यापायी त्या मुलाला अन्न-पाण्यावाचून एका खोलीत कोंडून ठेवले. त्या घटनेचा माझ्या मनावर खोल परिणाम झाला. प्रश्नाची दाहकता मला सुन्न करून गेली. तेव्हाच मी HIV+ मुलांसाठी काम करण्याचा निर्णय घेतला.

**समाजातील विविध घटकांसाठी कार्यरत असलेल्या अशा व्यक्तींची माहिती थिंक महाराष्ट्र या वेबपोर्टलवर सातत्याने प्रसिद्ध होत असते. आता हे पोर्टल नव्या स्वरूपात वाचकांसमोर सादर करण्यात आले आहे. या प्रकारच्या व्यक्ती अथवा संस्थांची माहिती आपणासही लिहून पाठवता येईल. यासाठी ९०२९५५७७६७ किंवा ०२२-२४१८३७१० या क्रमांकावर अथवा पुढील पत्त्यावर संपर्क साधावा. व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन, ३, वेणू अपार्टमेन्ट१, केसरबाग कंपाऊंड, बी. जे. देवरूखकर मार्ग, शिंदेवाडीसमोर, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४**
**thinkm2010@gmail.com**

मी लहानपणापासून भावाकडे शिकायला म्हणून राहत होतो. कुटुंबात राहिलो, की त्या कुटुंबाचा अधिकारही प्रकल्पावर येईल म्हणून मी घर सोडले; लग्न न करण्याचा निर्णय घेतला आणि १४ ऑगस्ट २००८ला नोकरीही सोडली.

'सेवालय'ची सुरुवात केली तेव्हा मी एकटा होतो, पण चालताना अनेक समविचारी मित्र, मान्यवर, तरुण-तरुणी स्वयंस्फूर्तीने सोबतीला आले; ते 'सेवालय'-मधल्या मुलांचे आई, बाप, बहीण, भाऊ बनले. माझे मित्र शांतेश्वर यांचे आजोबा



सेवालयची उभारणी करण्यासाठी चाललेले श्रमदान



'सेवालया'चे सभागृह आणि मुले

मन्मनथाप्पो मुक्तो यांनी 'सेवालय'साठी साडेसहा एकर जमीन दान केली. 'आम्ही सेवक'च्या टीममधील काही तरुणांनी सहकार्य केले. आम्हाला 'सेवालय'च्या उभारणीसाठी निधीची आवश्यकता होती. मग आम्ही लातूरच्या शाळा-कॉलेजांत जाऊन मदतीसाठी आवाहन केले. शाळांमध्ये 'खाऊमधून एक रुपया' ही मोहीम सुरू केली. तिला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यातून साठ हजार रुपये गोळा झाले. शासकीय अधिकाऱ्यांनी कायम सहकार्य केले. आम्ही 'पैसे नकोत, मूठभर तांदूळ द्या' अशी मोहीम राबवली. तिलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. काही शाळा तर दर आठवड्याला तांदूळ पाठवतात. आरंभी एखादा मुलगा आजारी पडायचा, अत्यवस्थ व्हायचा, तेव्हा त्याला दगडधोंड्यांतून वाट काढत दुचाकीवर शहरात न्यावे लागे. खूप हाल व्हायचे. मग 'दैनिक एकमत'चे संपादक शरद कारखानीस यांनी वर्तमानपत्रातून संस्थेच्या मदतीसाठी आवाहन केले अन् लोकवर्गणीतून 'सेवालय'ला रुग्णवाहिका मिळाली.'' हे सर्व सांगता सांगता बापटले गहिवरले.

'सेवालय' जरी लोकसहभागातून चालत असले, तरी 'सेवालय'ला स्थापनेच्या वेळी लोकप्रतिनिधींपासून जनसामान्यांपर्यंत अनेक पातळ्यांवरून विरोधच झाला होता. तो वर्तमानपत्रांतून गाजलाही होता. शाळांतून गोळा करण्यात आलेल्या साठ हजार रुपयांतून जुलै २००७ मध्ये 'सेवालय'च्या कार्यालया-साठी दोन खोल्या बांधण्यात आल्या. त्या बांधत असताना गावकऱ्यांनी विरोध केला. 'सेवालय'च्या एका बाजूस गाव आहे तर दुसऱ्या बाजूस लमाणांचा तांडा. गावकऱ्यांनी काही जणांना सेवालयविरुद्ध भडकावले. एके रात्री तर साठ-सत्तर लोकांचा जमाव 'सेवालय'वर चालून आला आणि त्यांनी कार्यालयासाठी बांधलेल्या दोन खोल्या पाडल्या. बापटले यांनी पोलिसांचे संरक्षण मागितले. पण त्यांना वादही वाढवायचा नव्हता; म्हणून त्यांनी कोणावर पोलिसकेस केली नाही. ज्या लोकांनी 'सेवालय'वर हल्ला केला त्या लोकांनी कालांतराने 'सेवालय'चे काम पाहिले आणि त्यांचे मतपरिवर्तन झाले. त्याचे उदाहरण म्हणजे 'सेवालय'चे बांधकाम पाडताना पुढे असलेला प्रकाश आडे हा तरुण त्याच्या पत्नीसह 'सेवालय'मध्ये पूर्णवेळ काम करतो. लमाणांचा तांडा बापटले आणि 'सेवालय' यांच्या बाजूने आहे. बापटले स्वतः त्या तांड्यात जाऊन काही ॲक्टिव्हिटी घेतात. गाव त्यांच्या कामास जोडले गेले नसले तरी तांडा जोडला गेला आहे अशी भावना बापटले यांची आहे.

बाजूच्या गावाने प्रकल्पास वीज देण्यासाठी नकार दिला. तो काळ 'सेवालय'साठी बराच खडतर होता. अशा कितीतरी दिव्यांमधून जात 'सेवालय' उभे राहिले! चिमुरड्यांना गावच्या शाळेत प्रवेश नाकारण्यात आला. गावकऱ्यांनी 'आमच्या पोरास्नी शेण काढाय पाठवू पर त्या पोरांबरूबर शाळंत घालणार नाय' अशी भूमिका घेतली. त्यांचा (गैर)समज एचआयव्हीबाधित मुलांसोबत राहिल्याने आपल्या मुलांनाही HIV+ ची लागण होईल असा होता.

शेवटी, बापटले यांनी गावकऱ्यांची महत्प्रयासाने हरप्रकारे समजूत घालून मुलांसाठी शाळेचे दरवाजे उघडायला लावले. बापटले यांनी गावकऱ्यांना हात जोडून विनंती करत त्यांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. 'सेवालय'ची मुले गावातील इतर मुलांच्या बरोबरीने शिक्षण घेत आहेत. शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले आहेत, पण बहुतेकांच्या HIV+ मनाचे दरवाजे अजूनही बंद आहेत. हसेगावच्या ग्रामपंचायतीकडून 'सेवालय'वर घालण्यात आलेला बहिष्कार कायम आहे!

'सेवालय'चा १४ ऑगस्ट हा वर्धापनदिन. उजाड माळरानावर पाया खोदून दगड-माती-विटांनी हिरवेगार, रम्य 'सेवालय' उभे राहण्याच्या प्रवासात अनेक महाविद्यालयीन तरुण-तरुणींचा सहभाग आहे. 'सेवालय'कडून १४ ऑगस्ट अन् ३१ डिसेंबरला रॅली काढून, व्यसनमुक्ती अन् एड्सविषयक जनजागृती करण्याचा उपक्रम दरवर्षी केला जातो. पेटती मशाल अन् फडकता तिरंगा घेऊन मोठ्या व्यक्तींसह 'सेवालया'तील चिमुरडी लातूरपर्यंतचे अकरा किलोमीटर अंतर धावत पार करतात. रॅली लातूरच्या वेगवेगळ्या मार्गांनी दरवर्षी काढली जाते. रॅलीचे गांधी चौकात पोचल्यानंतर राष्ट्रगीतासह विसर्जन होते.

अनेक व्यक्ती 'सेवालय'शी जोडल्या

गेल्या आहेत. एस.टी.चालक असणारे शिवराज टिमके सरांसह मुलांचेही मामा बनले. मेडिकल रिप्रेझेण्टेटिव्ह असलेले सूर्यकांत बंडवार यांना अपघात झाला. त्यांनी बारा महिने बेडवर राहिल्यानंतर समाजाची सेवा करण्याचा निश्चय केला. त्यांना 'सेवालय'बद्दल कळले. सूर्यकांत बंडावार काका इथे आले. त्यांच्या पत्नी ही समजून-उमजून त्यांना साथ देतात. ती दोघेही 'सेवालय'मध्ये पूर्णवेळ काम करत आहेत. काकूंनी स्वयंपाकाची तर काकांनी औषधोपचाराची जबाबदारी उचलली आहे.

'सेवालय'ची धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी झाली आहे. बापटले यांनी मुलांना निवासी ठेवण्यासाठीचा परवाना मिळवला आहे. 'सेवालय'ची वास्तू लहान लहान खोल्यांमध्ये विभागलेली आहे. एका बाजूला चार रूम आहेत. त्यात लहान मुले झोपतात. खासदार रूपाताई पाटील-निलंगेकर यांनी संस्थेला पाच लाखांची मदत केली होती. त्यातून एक हजार स्क्वेअर फुटांचा हॉल बांधण्यात आला आहे. शाहू कॉलेजचे पहिले प्राचार्य, स्वामी रामनंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू आणि लातूरचे नगरसेवक-खासदार डॉ. जर्नादर वाघमारे यांच्याकडूनही 'सेवालय'ला दहा लाखांची मदत करण्यात आली आहे. 'सेवालय'साठी गवत-काठ्यांपासून चार कुट्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यांपैकी एकीत रवी बापटले राहतात. उरलेल्या तीन कुट्यांमध्ये मुले दिवसभर असतात. गावकऱ्यांकडून करण्यात आलेल्या हल्ल्यानंतर पुन्हा गैरप्रकार घडू नयेत यासाठी रात्र झाल्यानंतर मुलांना हॉलमध्ये झोपण्यास पाठवले जाते. सात अॅटॅच संडास-बाथरूमची सोय आहे. एक मोठे स्वयंपाकघरही आहे. संस्थेने सर्वप्रथम बांधलेल्या दोन खोल्यांचा वापर कार्यालय आणि धान्याची कोठी म्हणून केला जातो.

लातूरपासून अकरा किलोमीटर दूर, हासेगावजवळ 'सेवालय' उभे आहे. 'सेवालय'कडून दरवर्षी एक ते पाच मे दरम्यान श्रमशिबिर घेतले जाते. श्रमदानातून शेततळे,

**आमटे दांपत्याने 'सेवालय'ला भेट दिली असताना - रवी बापटले, प्रकाश आमटे, मंदा आमटे आणि माधव बागवे**



भाजीपाल्यासाठी अर्धा एकर जमीन, 'सेवालय'च्या कुट्या आणि एक नर्सरी तयार करण्यात आली आहे. नर्सरीमध्ये बाराशे झाडे असून त्यांपैकी नऊशे झाडे केशर आंब्याची आहेत. त्यांचे उत्पन्न सुरू होईल.

प्रत्येक मुलाचा महिन्याचा किमान खर्च दोन हजार रुपये असतो. प्राथमिक, औषधोपचार, शिक्षण वगैरेंचा खर्च बऱ्यापैकी भागतो. मुले दत्तक योजनाअंतर्गत आतापर्यंत सतरा जोडप्यांनी तेथील प्रत्येकी एक मूल दत्तक घेतले आहे. मुलाच्या महिन्याच्या खर्चातील अर्धी रक्कम जोडप्याकडून देण्यात येते. 'सेवालय'ची टीम एड्सबद्दल जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्रभर फिरते. देणगीसाठी आवाहनही केले जाते. त्यातून जमा होणारा निधी 'सेवालय'साठी वापरला जातो.

'सेवालय' कोवळ्या वयातल्या मुलांचा केवळ सांभाळ करून थांबणार नाही, तर रवी बापटले यांनी मुलांचे आर्थिक-सामाजिक पुनर्वसन करण्याचा निर्धार बोलून दाखवला. योग्य वयात त्यांचे विवाह लावून देऊन त्यांचे भविष्य अधिकाधिक आश्वासक बनवण्याचे बापटले यांचे स्वप्न आहे.

मुलांना भेटायला 'सेवालया'त गेले की ती बिलगतात अन् भरून आलेले डोळे घेऊन निरोपाचा हात सोडता सोडत नाहीत. नववीत असलेली राणी बोलकी आणि हुशार आहे. ही पोर स्वतःची खरीखुरी कहाणी सांगत लोकांना बदलण्याचे आवाहन करत महाराष्ट्रभर फिरते. राणी म्हणते, की मला लोक विचारतात, तुला मोठेपणी काय व्हायचेय? मी म्हणते, मला संशोधक होऊन HIV+वर औषध शोधून काढायचेय! आई-वडील लहानपणीच वारले. नातेवाईकांनी मला सांभाळायला नकार दिला. मी आत्महत्या करण्याचा प्रयत्न तीन वेळा केला. मात्र मला जगायचंय. मी माझ्या आई-वडिलांना सरांमध्ये पाहते. मला आता इथल्या माझ्या छोट्या भावा-बहिणींसाठी जगायचंय. सकाळी 'मन का विश्वास कमजोर हो ना...' या ओळी आळवणाऱ्या त्या चिमुकल्या भाबडेपणामागचा समंजस कणखरपणा निःशब्द करणारा होता.

**रवी बापटले**
९५०३१७७७००

**शर्मिष्ठा भोसले**
sharmishtha.2011@gmail.com
सेवालय हासेगाव, ता. औसा,
जि. लातूर - ४१३५१२

# एकदा तरी अनुभवावी पंढरीची वारी

**महेश म्हात्रे**



'ज्या देशाचे लोक पंढरपूरच्या वारीला जातात, त्या देशाला महाराष्ट्र म्हणतात,' अशी महाराष्ट्राची एक व्याख्या मानववंशशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे यांनी केली आहे. त्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या वारीविषयी लिहिणे हासुद्धा एक वेगळा 'अनुभव' आहे; कारण पंढरीचा पांडुरंग ही लोकदेवता आहे आणि आषाढी-कार्तिकीची वारी हा अवघ्या मऱ्हाटीजनांचा कुळाचार. म्हणून महाराष्ट्र आणि मराठी माणसाचे मन समजून घ्यायचे असेल तर... वारकरी व्हा!

वारकरी संप्रदाय महाराष्ट्रात आणि लगतच्या कर्नाटक, आंध्र, गुजरात, मध्यप्रदेशात बऱ्यापैकी पसरलेला आहे. या संप्रदायात आपल्या आराध्य दैवतांची, पंढरपूरच्या पांडुरंगाची वारी करणे याला खूप महत्त्व आहे. गृहस्थाश्रमी वैष्णवजनांना पंधरा-वीस दिवस संन्यासाश्रमाचा अनुभव देणे हे खरे तर वारीचे मूळ उद्दिष्ट असावे, असे मला वाटते. वारीत चालणारा माणूस पूर्णपणे निसर्ग आणि सभोवतालच्या परिस्थितीवर अवलंबून असतो.

वारीला जसा आध्यात्मिक वसा आणि वारसा आहे, तद्वत सामाजिक संदर्भही आहेत. वारी म्हणजे चालते-बोलते स्नेहसंमेलन, वारी म्हणजे धावती अध्यात्मशाळा आणि वारी म्हणजे उत्स्फूर्त कला सादर करणाऱ्यांचा मेळा. पंढरीच्या वारीत अठरापगड जातींच्या लोकांचे भव्यसंमेलन भरते. कोणतीही उपाधी मिरवणे याचा वारकरी संतांनी निषेध केलेला असल्यामुळे या संमेलनाला 'अध्यक्ष' नसतो. अधिकाराने, म्हणजे ज्ञान, कर्तृत्व आणि त्याग-संयमाने वरिष्ठ असणाऱ्यांचा सर्व लोक सन्मान करतात. अर्थात खरा अधिकारी पुरुष, त्या सन्मानाचा नम्रपणे स्वीकार करतो आणि खंबीरपणे त्यागही करतो. जसे सर्वच क्षेत्रांत 'बनावट' लोक निर्माण झाले आहेत, तसे वारीतही अनेक 'अभिनयपटू' दिसतात. त्यांच्या टिळा-माळांचा थाट आणि टोपीचा काठ पाहण्यासारखा असतो. काही लोक त्याला भुलतातही; पण ज्यांची अध्यात्माचीच वाट चुकली आहे अशांची ज्यांना 'भूल' पडते ते 'ग्यानबा-तुकाराम' फक्त तोंडाने म्हणतात. संतांचा उपदेश ज्याच्या पचनी पडतो, ते काही अशा लोकांच्या नादी लागत नाहीत.

दोन्हीकडच्या आजोबांकडून पांडुरंग आणि वारीच्या कथा आणि प्रथांचा प्रवाह माझ्या रक्तात संक्रमित झाला असावा. विशेषत: आईच्या तोंडून ऐकलेल्या विविध अभंगांनी हा प्रवाह सतत खळाळता ठेवला. आई 'हरि मुखे म्हणा। हरि मुखे म्हणा' असे तालात म्हणायची तेव्हा, 'हा हरि कोण' असा प्रश्न मनात उद्भवला आणि त्यापाठोपाठ त्याच्या कलंदरपणाच्या असंख्य कथांची पोतडी समोर उलगडली गेली. सगळ्याच गोष्टी गमतीच्या. कृष्ण चोरी करणारा, थट्टा-मस्करी करणारा, मित्रांमध्ये रमणारा आणि दुष्ट राक्षसांना मारणारा म्हणून आवडायचा. संतांनी कृष्णलीला पेंद्याच्या बोबड्या शब्दात अभंगबद्ध केल्यामुळे हे सगळे शक्य झाले होते. दिंडीत जेव्हा दिंड्या विसाव्यासाठी थांबतात, तेव्हा थकलेल्या पायांचा विसर पडावा म्हणून नाथांची भारुडे आणि बोबड्या बोलांच्या अभंगांची फक्कड मैफल भरते. कोणत्याही साधनाशिवाय उभ्या राहिलेल्या त्या प्रतिभासंपन्न कलावंतांचा अभिनय, आवाज, नृत्य आणि वादनाकडे फक्त पाहात राहवेसे वाटते. त्यांचा आवाज कानात साठवून ठेवावासा वाटतो.

पंढरीच्या वारीत दु:ख-दारिद्र्याने गांजलेली, संसारतापाने पोळलेली लक्षावधी जनता तांबडे फुटल्यापासून सूर्य मावळेपर्यंत चालत असते. पण वारीचे वैशिष्ट्य असे, की एरवी शेत आणि शेतीवर आधारित कामधंद्यात गुंतलेल्या बायामाणसांना वारीच्या वाटेवर 'माऊली'चे स्थान मिळते. वारकरी संप्रदायात चमत्कार, नवससायास याला स्थान नाही; परंतु ज्ञानेश्वर माऊलींच्या दिंडीत चालणाऱ्या पाच वर्षांच्या चिमुरड्या मुलीपासून ऐंशीच्या आजोबांपर्यंत साऱ्यांना 'माऊली' नावाने संबोधले जाते. तसे वागवले जाते. हा आजही घडणारा, डोळ्यांनी दिसणारा 'चमत्कार' वारीत पाहायला मिळतो.

सामान्याला असामान्यत्व देणाऱ्या या वारीच्या परंपरेने महाराष्ट्रात सामाजिक ऐक्याची मुहूर्तमेढ तेराव्या शतकातच रोवली. संन्याशाची पोरे म्हणून बहिष्कृत जीवन अनुभवलेल्या निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताई या चार अलौकिक व्यक्तिमत्त्वांनी मऱ्हाटमोळ्या समाजात जणू 'आध्यात्मिक लोकशाही'चा पाया घातला! ज्ञानदेवांनी ज्ञानाची तर नामदेवांनी नामाची साधना अगदी

सहजपणे लोकांसमोर ठेवली. त्यात व्रतवैकल्य, कर्मकांड आणि रूढाचाराचे स्तोम नव्हते. मुख्य म्हणजे भक्तीच्या बळावर चोखामेळा, सजन कसाई, गोरा कुंभार, नरहरी सोनार, कान्होपात्रा, जनाबाई या तत्कालीन कर्मठ वातावरणात अस्पृश्य आणि हीन समजल्या जाणाऱ्यांनाही संतपद मिळू शकते, हे वारकरी संप्रदायाने सिद्ध केले.

दिंडीत वारकऱ्यांच्या जगण्या-वागण्यात जी सहजसुलभता असते, त्यामागे संतांच्या प्रेरणा अभंगपणे चालत असतात. अगदी पहाटेपासून सुरू होणारी काकड आरतीची आळवणी 'उठा पांडुरंगा आता दर्शन द्या सकळा, झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा' या शब्दांतून गारव्याने आळसावलेल्या आसमंतावर बरसते, तेव्हा दिंडीतील लहानथोरांची लगबग बघण्यासारखी असते. माऊलींची, तुकोबांची वा सासवडच्या सोपानकाकांची दिंडी रोजच्या मुक्कामावरून मार्गस्थ होण्याचे काही नियम आहेत. त्यात संकेतांना महत्त्व असते. कुठेही आरडाओरड नाही की धक्काबुक्की नाही. चोपदारांच्या हातातील दंडाच्या इशाऱ्यानुसार लाखो लोकांच्या हालचालींचे नियंत्रण होते. कुठे विसावा घ्यायचा, कुठे हरिपाठ सुरू करायचा याचे इशारे चोपदार फक्त हातातील दंड उभारून देतात. दिंडीत संतांना मान दिला जातो, पण त्याचा अतिरेक नसतो. 'वर्ण अभिमान विसरली याती। एकमेकां लोटांगणी जाती' अशी या चंद्रभागेच्या वाळवंटात खेळ मांडणाऱ्या वैष्णवांची स्थिती असते. तेथे उच्चनीचतेचा भेद नसतो. दंभ-अभिमान नसतो. फक्त एकच ओढ असते, 'सावळे सुंदर, रूप मनोहर' पाहण्याची.

वारीत गेल्याशिवाय वारकऱ्यांची ही लोकविलक्षण भक्ती आपल्याला कळत नाही. दिंडीत दररोज होणाऱ्या भजनांमध्ये संत तुकारामांच्या अभंगांची संख्या जास्त आहे. त्याबद्दल एका कीर्तनकारांना विचारले असता ते म्हणाले, 'तुकोबा हे तुमच्या-आमच्यासारखे प्रांपचिक होते. लग्न, व्यवसाय, आर्थिक चढउतार आणि कौटुंबिक आघात या आपल्या सर्वांना कराव्या लागणाऱ्या गोष्टींचा त्यांनी सामना केला होता. त्यामुळे तुकाराम महाराजांचे शब्द हृदयाला भिडतात. तुमच्या-आमच्यातील तुकोबा आध्यात्मिकदृष्ट्या उच्च पदावर गेल्यावर जे मार्गदर्शन करतात त्यात आचरण्यास सोपा आणि अंतिमत: हिताचा सल्ला असतो. तुकोबांचे मानवी व्यवहार निरीक्षण अचूक आहे. सुंदर प्रपंच आणि उत्कट परमार्थ या दोन्हींचे एकवट दर्शन घ्या. 'नामसंकीर्तन साधनपै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची... न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण' असा सहज आणि सोपा मार्ग तुकोबा सांगतात. म्हणूनच असेल कदाचित, वारकऱ्यांच्या नित्यपाठात तुकोबांचे अभंग जास्त प्रमाणात असतील.''

मागील वर्षी दिंडीत चालताना एक जपानी वारकरी महिल्या भेटल्या. त्यांचे नाव युरिको इकेनोया. वयाच्या साठीतही नवे शिकण्याचा अमाप उत्साह. तीस वर्षांहून अधिक काळ त्या दिंडीत चालतात. आधी उत्सुकता आणि त्यानंतर पांडुरंग भेटीची आतुरता, हेच या दिंडीप्रेमामागील खरे कारण आहे, या शब्दांत त्यांनी आपल्या भावना सांगितल्या. अशाच एका पहाटे, डोक्यावर बोचके घेऊन निघालेले वृद्ध आजोबा दिसले. दिंड्यांचा मुक्काम हलण्याआधी म्हातार-बोवांनी आपली थकलेली पावले उचलली होती. हातातील काठीवर भार टाकत, तोंडाने 'रामकृष्ण हरी'चा जप करत आजोबा वाटचाल करू लागले. मी सहज त्यांच्याजवळ जाऊन, 'जय हरी माऊली'चा आवाज दिला. त्यांच्या थकलेल्या शरीरात दडलेल्या प्रचंड ऊर्जाशक्तीने 'जय हरी.. जय हरी'चा प्रतिसाद दिला. 'माऊली, दिंड्या अजून निघाल्या नाहीत, तुम्ही एकटे कुठे निघालात?' हातातील काठी उभारून आजोबा थांबले. म्हणाले, 'काय माऊली, म्हाताऱ्याची गंमत करता काय, मी एकला कुठं हाव? ही पाहा माझी ज्ञानेश्वर माऊली काठी बनून मला पंढरपूरला घेऊन निघाली आहे. माऊलीचा हात धरलेला असेल तर दुसऱ्या कोणाची गरज कशाला?' आजोबांच्या त्या उत्तराने आम्ही सारेच गप्प झालो. आजोबा बोलू लागले, ''तुम्ही मुंबईहून आलेले दिसता. मी पण तुमच्याएवढा होतो तेव्हापासून दरवर्षी वारीला येतो. रोज सकाळी उठलो, की 'पंढरीचा वारकरी । वारी चुको न द्यावी हरी' अशी देवाला विनवणी करतो. माझी विठाई माऊली फार प्रेमळ. बघा ना, माझे वय ८० च्यावर गेले तरी मला ती सोडायला तयार नाही. आता एकच इच्छा उरलीय. त्या पंढरीच्या वाटेवर नाय तर पांडुरंगाच्या दारात मरण यावं, बस एवढंच मागणं आहे, माझ्या विठुरायाकडं.. चला माऊली, तांबडं फुटलंय. आमची पायगाडी जुनी झालीय, तुम्ही लोक जवान आहात. धावत पंढरीला जाऊ शकता, आमची खटारा गाडी हळुहळूच चालणार.. पांडुरंग हरी, पांडुरंग हरी.''

एकेक पाय सावकाश उचलत, सबंध शरीराचा भार काठीवर टाकत ऐंशीच्या घरातील आजोबा चालू लागले. ओठांवर 'रामकृष्ण हरी'चा जप आणि डोळ्यांमध्ये पांडुरंगाचे रूप साठवत त्यांचे थकलेले शरीर उत्साहाने पंढरीच्या वाटेने निघाले होते.

त्याच दिवशी संध्याकाळी, 'तुम्ही पंढरपूरला धावत जाऊ शकता' या आजोबांच्या वाक्याचा प्रत्यय आला. पंढरी टप्प्यात आली असे लक्षात आल्यानंतर देहूकर तुकोबा खांद्यावरील पताका उंचावून पंढरीच्या वाटेने धावत सुटायचे. 'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, कर कटावर ठेवूनिया' या एकाच ओढीने त्यांचे देहभान हरपत असे. 'तुका म्हणे धावा, आता पंढरी विसावा.' त्याची आठवण म्हणून वेळापूरजवळ समस्त वारकरी दिंडीच्या त्या टप्प्यावर एक किलोमीटरची वाट धावून पूर्ण करतात. त्याला 'धावा' म्हटले जाते. ती जागा जवळ येताच पहिल्या दिंडीचे चोपदार हातातील चांदीचा दंड उंच उभारून इशारा देतात आणि लक्षावधी वारकऱ्यांचा जनसागर, अचानक भरती आल्यानंतर सागराच्या लाटा जशा किनाऱ्याकडे धावतात, त्या गतीने पंढरीच्या



वारीचा अनुभव – मध्यभागी महेश म्हात्रे

दिशेने झेपावू लागतो. हातात वीणा घेतलेले वीणेकरी, डोईवर तुळशीवृंदावन, हंडे, कळशा घेतलेल्या आया-बाया, वजनी मृदंग-पखवाज खांद्यावर असलेले मृदंगमणी, टाळकरी, भगव्या पताका खांद्यावर घेतलेले झेंडेवाले, भिन्न वयोगटांतील आबालवृद्ध 'माऊली, माऊली' म्हणत पंढरपुरात बसलेल्या विठूमाऊलीच्या दिशेने धावतात. कुणी पायात पाय अडकून पडतात, पुन्हा 'माऊली'चा जयघोष करत धावू लागतात. दीडेकशे किलोमीटर चालून पाय थकलेले असतात; पण पंढरपूर जवळ आले, ही बातमी तनमनात जोश फुलवते. कारण पंढरीच्या ओढीने प्रत्येक वारकऱ्याच्या डोळ्यांसमोर विठाई, कृष्णाई, कान्हाई नाचत असते.

दिंडी ज्या मार्गाने जाणार असते, त्या गावातील सरपंच वा स्थानिक नेते गावाच्या वेशीवर पालखीचे स्वागत करण्यासाठी उभे असतात. दिंडीप्रमुख आणि माऊलीच्या अश्वाचे मोठ्या कौतुकाने स्वागत होते. पालखीपुढे लोटांगणे घातली जातात आणि गावात शिरावे तर सकाळ, दुपार असो वा संध्याकाळ, हातात खाण्याच्या वस्तू घेऊन दुतर्फा लोक उभे! कुणी चहा, कुणी सरबत पिण्याचा आग्रह करतोय. कुणी हातात बिस्किटचे पुडे घेऊन, 'माऊली एक तरी पुडा घ्या ना' असा आग्रह धरत आहे, असे दृश्य बघायला मिळते. गोपीचंदनाची उटी कपाळावर लावलेले बाळगोपाळ तर लडिवाळपणे त्यांच्याजवळील केळी वा चॉकलेट घेण्याचा हट्टच धरतात. त्यावेळी ज्ञानोबा-तुकोबांनी मऱ्हाटी समाजात रुजवलेली 'जे जे दिसे भूत। ते ते मानिजे भगवंत' ही सर्वांच्या ठायी परमेश्वर बघण्याची भावना डोळ्यांसमोर साकार होते.

ग्रामीण भागातील लोकांनी या जुन्या परंपरा आणि विचारांची ठेव नव्या पिढीकडे देण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. याचा प्रत्यय वारीत सातत्याने येतो. अशाच एका सकाळी, ज्या दिवशी २८ किलोमीटरचा टप्पा पार करायचा होता, आम्ही सहा-आठ जण आडवाटेने चालत दिंडीच्या पुढे निघालो होतो. सकाळीच चहा-पोह्याचा दोनदा आग्रह झाल्याने काही खाण्याची इच्छा नव्हती. ऊन तापण्यापूर्वी किमान अर्धा टप्पा गाठावा या विचाराने पावले वेगात पडत होती. एका निर्मनुष्य रस्त्यावर शाळेचा पोषाख घातलेली पाच-सहा वर्षांची चिमुरडी उभी होती. सगळ्यात पुढे असलेल्या जयसिंगबाबू जगतापांना त्या मुलीने थांबवले. घरापासून दहा-बारा दिवस दूर असलेल्या बाबांना आपल्या नातीची आठवण झाली असावी. उत्साही आवाजात ते आम्हाला म्हणाले, 'अरे, ही दीदी बघा काय सांगतेय, घरी जेवायला चला.'

आमच्या गटाने एकमुखाने नकार दिला; पण बाबांना त्या मुलीचा आग्रह मोडवला नाही आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध आम्ही जाण्याचा प्रश्नच नव्हता. आम्ही 'येतो' म्हणताच ती पोरगी वारा प्यालेल्या वासरागत वस्तीकडे पळाली. 'आये, माऊल्या आल्या गं', अशी आसमंत घुमवणारी हाळी तिच्या नाजूक ओठांतून निघाली आणि आमची पावले शेतातील काळ्याजर्द पाऊलवाटेवरून वस्तीकडे निघाली.

माझ्या अनवाणी पायांना काळ्या आईने अबीरबुक्क्याने रंगवून टाकले अन् गाई-गुरांचा प्रशस्त गोठा, पाण्याची मोठी टाकी आणि पुढे-मागे पसरलेले घर, या चिमण्यापोरीच्या आवाजाने सावध झाले होते. खिल्लारी जोडी घेऊन निघालेल्या किसनरावांनी हातपाय धुवायला पाणी दिले. दुसरा भाऊ मोटारसायकलवर दुधाची भलीमोठी किटली अडकवत होता, तर स्वयंपाकघरात जेवणाची लगबग चालली होती. नुकताच नाश्ता झाल्याने पोट भरले होते. त्यामुळे 'चहा दिला तरी चालेल', अशी आम्हा बुद्धिवंतांनी सूचना केली. 'माऊली थोडा दम धरा, दहा मिंटात जेवन करते', असा आतून आवाज आला. आम्ही सारे गप्प. तेवढ्यात गोकुळासारख्या त्या घरातील चार-पाच बालगोपाळ पुढे आले. त्यांच्याशी गप्पा मारताना पंधरा-वीस मिनिटे कशी गेली कळलेच नाही. पुन्हा एक पोक्त आवाज कानी पडला, 'माऊली, हात धुऊन घ्या, जेवण तयार आहे.' आम्हाला बैठकीच्या खोलीत नेण्यात आले. आमच्यापाठोपाठ गरमागरम ज्वारीच्या भाकऱ्या, आमटी, ठेचा आणि दह्या-दुधाच्या वाट्या असलेली ताटे आली. त्या सुग्रास जेवणाच्या सुगंधानेच,

अर्ध्या तासापूर्वी भूक नाही म्हणणारे आम्ही सारेजण जेवणावर तुटून पडलो. पाचच मिनिटांत चुलीवर भाजलेल्या भाकऱ्यांची चवड घेऊन आजीबाई आल्या आणि चक्क आमच्या पंगतीमध्ये बसल्या. त्यांच्या डोळ्यांत आम्हा अनोळखी लोकांबद्दल अपार माया दिसत होती. 'सावकाश खा माऊली' या आग्रहातून प्रेम निथळत होते. 'सकाळधरून वाट बघत होते बघा तुमची, त्या पोरीला कवापास्नं तुमच्या वाटेवर उभी केली होती. म्हनलं एका तरी माऊलीला घरी जेवाया घेऊन ये. मंग शाळंत जा. शाळा काय रोजचीच, माऊली काय वर्षातून एकदा येणार.' आजीबाई बोलत होत्या.

मी विचारले, 'माऊली, तुम्ही वारी केलीय कधी?' तशा आजी गंभीर झाल्या. ''या सगळ्या परपंचातून कुठं वेळ मिळणार? आता घर-दार सगळं ठीक, तर तब्येत बिघडते. म्हणून पोरं म्हनतात, म्हातारे एकटी वारीला जाऊ नको. आता आपण त्यांच्या हातात हाओत. मग पोरांचं मन दुखवून कसं चालेल? म्हणून माऊलीला साकडं घातलं, मला सोबत नेत न्याय, तर घरी जेवायला तर ये. तुम्ही घरी आलात, मला पांडुरंग भेटला.'' असे बोलून आजीबाई भक्तिभावाने हात जोडती झाली आणि संस्कृत गीतेचा अर्थ सोप्या भाषेत उकलून दाखवणारी ज्ञानेश्वरी, जनगंगेच्या ओठांवर तरंगलेली तुकोबांची गाथा आणि देश-धर्म-भाषेच्या भिंती ओलांडून पसरलेली नामदेवांची अभंगवाणी त्या भाबड्या आजीबाईच्या सश्रद्ध मनात मूर्तिमंत अवतरलेली दिसली.

त्या अलौकिक साक्षात्काराने गाव-खेड्यात वसलेल्या माझ्या मऱ्हाटी मुलखाची थोरवी कळली. वारीत असे जगावेगळे अनुभव दररोज येत असतात. लक्षावधी लोकांचा त्यांना हवा तसा प्रतिपाळ करणारा पांडुरंग 'मागे-पुढे उभा राहे सांभाळीसी। आलिया आघात निवाराया' असे सांगत सोबत करत असतो. त्यामुळे दिंडीमध्ये आपल्याला खऱ्या अर्थाने विश्वरूपदर्शन घडते.

वारीमध्ये सर्व प्रकारचे लोक असतात. जगात जसे सज्जन आणि दुर्जन भरलेले आहेत, तद्वत वारीतही असणारच; पण वारीतील वारकरी त्यांच्याकडेही 'माऊली' म्हणूनच पाहतात. एकदा एका शहराच्या वेशीजवळ एक दारू प्यालेला माणूस दिंडीत घुसून 'ग्यानबा-तुकाराम'च्या ठेक्यावर नाचायला लागला. दारू प्यायल्यामुळे त्याचा तोल जात होता. तेवढ्यात एका वयस्कर गृहस्थाने त्याला हाताला धरून पुढे झेंडेवाल्यांच्या रांगेकडे नेले आणि मोठ्या प्रेमाने सांगितले, 'माऊली, तुम्ही इथून भजन करा.' त्या दारुड्याच्या कानी 'माऊली' शब्द पडताच त्याची चर्या बदलून गेलेली दिसली.

एका ठिकाणी ज्ञानेश्वर माऊली आणि सोपानकाकांच्या पालख्यांची भेट होते. त्याला 'बंधूभेट' म्हणतात. त्या जागी दोन्ही पालख्या एकत्र येण्याने प्रचंड गर्दी होते. त्या गर्दीच्या वेळी एक पोलिस इन्स्पेक्टर मोटारसायकलवरून गर्दीचे नियंत्रण करताना दिसला. वारकऱ्यांना उद्धटपणे शिव्या घालणाऱ्या त्या इन्स्पेक्टरने एका ठिकाणी चक्क आपली मोटारसायकल रांगेत चाललेल्या दिंडीत घुसवली. त्याला दिंडी त्या जागी रोखायची होती. तेवढ्यात एक धिप्पाड तरुण वारकरी तीरासारखा पुढे सरसावला. त्याने त्या मोटारसायकलचे स्टेअरिंग असे काही वळवले की काही लक्षात येण्याआधी ती मोटारसायकल दिंडीच्या बाहेर पडली. एव्हाना दोन-चार तरुण वारकरी बाह्या सरसावत धावले होते. पहिल्या तरुणाने धाव घेऊन इन्स्पेक्टरचे मनगट पकडले आणि सांगितले, 'माऊली, दिंडीत भेटलात म्हणून वाचलात, परत अशी आगळीक करू नका. भारी पडंल.' नको त्या ठिकाणी पोलिसी खाक्या दाखवायला निघालेल्या इन्स्पेक्टरचा चेहरा पडला. दिंडी आपल्या गतीने वाट चालत होती.

तेराव्या शतकापासून ज्ञानोबांनी दिंडीचे पुनरुज्जीवन केले, तेव्हापासून परकीय आक्रमण असो वा नैसर्गिक आपत्ती, वारकऱ्यांच्या दिंड्या टाळ-मृदुंगांच्या घोषात आषाढी-कार्तिकीला पंढरीच्या मार्गावर चालू लागतात. एकादशीला भूवैकुंठ पंढरपूर वैष्णवांच्या मेळ्याने गजबजून जाते. अवघ्या आकाशात भगव्या पताका फडकताना दिसतात आणि आसमंतात घुमत असतो विठोबा-रखुमाईचा जयजयकार.

फक्त महाराष्ट्र-गोवाच नव्हे, तर कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू येथील दिंड्या पंढरपुरात दाखल होतात. अनेक परदेशी अभ्यासक या भक्तीच्या शक्तीचा अभ्यास करण्यासाठी आलेले असतात. त्यांना पांडुरंग भेटतो. 'अनंतरूपे, अनंतवेषे देखिले म्या त्यासी, बाप रखमा देवी वरू खूण सांगितली ऐसी' असा त्यांनाही प्रत्यय येतो. युगे अठ्ठावीस वीटेवर उभा असलेला हा विठोबा म्हणजे निर्गुण-निराकाराने घेतलेला साकार भाव. भक्तांच्या भावासाठी, भक्तीसाठी रुक्मिणीला सोडून पंढरपुरात आलेला विठोबा आणि वारीसाठी 'सुखी संसाराची सोडुनिया गाठ' चालत निघालेला खेड्यापाड्यातील, गरीब-श्रीमंत वारकरी हे महाराष्ट्राचे 'अद्वैत' आहे.

मराठी मन आणि महाराष्ट्र समजून घ्यायचा असेल तर वारीला चला. गेली ५४ वर्षे वारी करणाऱ्या एका कीर्तनकारांनी मला सांगितले होते, की जे लोक वारी करतात ते वर्षभर आजारी पडत नाहीत. कारण वर्षभर पुरेल एवढा मनाला आणि शरीराला व्यायाम होतो. सासवडचे अशोकबापू जगताप गेल्या वारीला थेट आयसीयूमधून आलेले मी 'याचि डोळा' पाहिलेले आहे. वारी म्हणजे जीवन आनंदाने जगण्याचा अखंड उत्सव. तो अजूनही संपूर्ण महाराष्ट्राला कळलेला नाही, कारण ज्ञानोबा-तुकारामचे कुणी 'ब्रँडिंग' केलेले नाही. खरे सागांयचे, तर असे करण्याची गरजही नाही. त्यासाठी पंढरीच्या वारीला चला आणि 'आनंदाचे डोही आनंदतरंग' म्हणजे काय ते साक्षात अनुभवा.

**महेश म्हात्रे**
maheshbmhatre@gmail.com

# एक अनोखे प्रकाशन

## प्रभाकर भिडे

३० जुलै २०१२. संध्याकाळी साडेसहाची वेळ. ठाण्याच्या सरस्वती शाळेचे क्रीडासंकुल एका आगळ्या समारंभासाठी सज्ज. प्रेक्षकांत अनेक दिग्गज मंडळींची उपस्थिती. त्यात प्रसिद्ध गायिका आश्विनी भिडे-देशपांडे आहेत, अच्युत गोडबोले आहेत. पहिल्या रांगेत प्रसिद्ध सिनेअभिनेते सचिन खेडेकर. त्यांच्या शेजारी ज्येष्ठ संपादक कुमार केतकर, दिनकर गांगल. प्रेक्षकांत उत्सुकता होती, कार्यक्रम अभिनव पद्धतीने आहे म्हणजे कसा?

इतक्यात स्टेजवर राहुल सोलापूरकर येतात. सुटाबुटात. जणू सिक्रेट एजंट विनोदच्या रूपात (गुप्तहेर) प्रवेश करतात आणि जाहीर करतात की आता येथे एका कादंबरीचे प्रकाशन होणार आहे. त्याचे नाव विचित्र आहे, 'लॉक ग्रिफिन' – लेखक वसंत वसंत लिमये. त्यातील रहस्य जाणून घ्यायचे आहे कारण ही, उत्कंठा वाढवत नेणाऱ्या राजकारणी पार्श्वभूमीवरील एवढा मोठा कॅनव्हास असलेली महत्त्वाकांक्षी कादंबरी आहे, असे म्हणतात. त्याचा गौप्यस्फोट होण्याअगोदर ह्या कादंबरीचा समाजावर काय परिणाम होणार आहे ते मला जाणून घ्यायचे आहे, कारण या कादंबरीला आंतरराष्ट्रीय संबंध आहे. यात अमेरिकेतील काही प्रसंग तसेच भारतातील राजकीय व्यक्ती आणि नैनिताल, दिल्ली, गुरगाव-मुंबई, डोंबिवली, कोकण अशी पार्श्वभूमी असून याचा आवाका फार मोठा आहे असे मला कळले आहे. या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना काय आहे हे कळणे आवश्यक आहे. त्याकरता या कादंबरीसंबंधातील मंडळींना भेटून काही माहिती मिळते का, हे जाणून घेण्याचा माझा प्रयत्न आहे. असे सांगून सोलापूरकर म्हणतात, मी प्रथम कादंबरीचे लेखक वसंत लिमये यांच्या पत्नी मृणाल परांजपे यांना भेटतो. लेखकपत्नी या नात्याने त्यांना कादंबरीची मध्यवर्ती कल्पना माहीत असेल. पण हाय! ती सांगते की कादंबरीत इतके बदल इतक्या वेळा सुचवले गेले की निश्चित काही कळत नाही. पण मला जे माहीत आहे ते इतकेच की 'लॉक' हा स्काटलंडमधील गेलीक भाषेतील शब्द आहे. त्याचा अर्थ लेक किंवा तलाव असा आहे. तसेच 'ग्रिफिन' हा पुराणातील काल्पनिक प्राणी आहे. त्याचे तोंड गरुडाचे व शरीर सिंहाचे आहे. त्याला काही वेळा सापासारखी शेपटी असते. ख्रिश्चन प्रतिमांमध्ये ग्रिफिनला प्रतिकात्मक महत्त्वाचे स्थान आहे. ग्रिफिन हे साहस व सामर्थ्य आणि शहाणपणा याचे प्रतीक आहे. 'लॉक ग्रिफिन' या शब्दाचा संदर्भ व गर्भित अर्थ असा या कादंबरीचा प्रवास असावा. बाकी मला जास्त काही माहीत नाही.

लेखकपत्नीकडून कादंबरीची मध्यवर्ती कल्पना कळली नाही तरी थोडा फार क्ल्यू मिळाला. आता आपण या कादंबरीसाठी लेखनिक म्हणून काम करणाऱ्या वंदना बोडस यांच्याशी बोलून काही मिळते का ते पाहू, असे म्हणत सोलापूरकर त्यांना प्रश्न करतात. त्यावर वंदना बोडस सांगतात, की कादंबरीसाठी लेखनिक म्हणून काम केले तरी शेवटची पन्नास पाने मी केली नाहीत. तसेच कादंबरीत बरेच बदल सुचवले गेल्यामुळे निश्चित काही सांगता येत नाही.

पण हा गुप्तहेर असा हरणारा नसतो. तो लेखकाच्या कंपनीत दहा वर्षे काम करणाऱ्या व वेळोवेळी सल्ला देणाऱ्या योगेश शेजवलकरांना गाठतो. विचारतो, तुमच्याशी लेखकाने कादंबरीविषयी सहकारी म्हणून चर्चा केली असेलच साहजिकच तुम्हाला कादंबरीची मध्यवर्ती कल्पना माहीत असेलच. तर ती काय आहे? योगेश लेखकाशी वेळोवेळी चर्चा झाल्याचे सांगतात. पण ती कादंबरीतील ठरावीक भागाविषयी. त्यातून निश्चित काहीच कळले नाही. ते वाचल्यावर कळेल असे वाटते, असे उत्तर देतात.

निश्चित असे काहीच न कळल्यामुळे सिक्रेट एजंट या कादंबरीचे गेली दोन वर्षे संपादन करत असलेल्या दिनकर गांगलांना गाठतो व त्यांना कादंबरीविषयी बोलते करण्याचा प्रयत्न करतो.

ते सांगतात, की कादंबरी अतिशय उत्कंठावर्धक असून मराठीत असे लिखाण विशेष झालेले नाही. पण या कादंबरीत बरेच बदल सुचविले गेले ते सुधारत सुधारत कादंबरीने आकार घेतला. लेखकाने प्रथम २३ वे प्रकरण लिहिले नंतर दुसरे! अशा तऱ्हेने ती घडली. मात्र तिची व्याप्ती व खोली लेखकाने कमालीची गाठली आहे. त्यातले नातेसंबंध, ठिकाणे, गुंतागुंत अशी ही जवळजवळ ५०० पानांची कादंबरी असून तुम्ही तुमचा शोध चालू ठेवा. कदाचित तुमच्या हाताला काहीतरी लागेल. जसे चित्रपटातील काही गोष्टी सांगून पुढील भाग पडद्यावर पाहा म्हणतात. तसेच कादंबरीचे आहे , असे सुचवतात.

शेवटी, या कादंबरविषयी सचिन खेडेकर या अभिनेत्याचे उद्गार ऐकून त्याला विचारून काही मिळते का हे जाणण्याचा प्रयत्न करतात. ते सांगतात, की कादंबरीला आंतरराष्ट्रीय कथानक असून अतिशय

अभ्यासपूर्ण लिहिली आहे. या कादंबरीचे कथानक भव्य असून त्यावर एक उत्तम चित्रपट होऊ शकतो. कादंबरी वाचकाला खिळवून ठेवणारी असून ती प्रत्यक्ष वाचून बघण्यात मजा आहे. त्यांच्यातील आंतरराष्ट्रीय रहस्याचा स्फोट केल्यास त्यातील वाचनाची मजा निघून जाईल.


मग आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास असणारे व कादंबरीची थोडीफार माहिती असणारे ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्याकडून कादंबरीची मध्यवर्ती कल्पना किंवा कादंबरीचा काही भाग कळतो हे जाणून घेण्यासाठी सोलापूरकर त्यांना व्यासपीठावर बोलावून बोलते करण्याचा प्रयत्न करतात. केतकर म्हणतात, या कादंबरीमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अनेक संदर्भ असून त्याकरिता लेखकाने अनेक वेळा चर्चा केली आहे. याबाबत बोलताना, १९७९ साली अफगाणिस्तानावर रशियाने हल्ला केल्यावर त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने पाकिस्तान व अफगाणिस्तान यांच्यातील धार्मिक मूलतत्त्वावाद पोसला व त्यातून दहशतवाद कसा निर्माण झाला, मग बांगलादेशाची निर्मिती, पुढे मुजीब-उर-रेहमान यांचा खून, तसेच इंदिरा गांधी, राजीव गांधी, बेनझीर भुत्तो यांचे खून आपल्यासमोर कसे झाले अशा गेल्या ३०-४० वर्षांतील आंतरराष्ट्रीय घडामोडी सांगून, याचा काही प्रभाव कादंबरीत असण्याची शक्यता आहे असे म्हणतात. मात्र कादंबरी कळण्यासाठी ही पार्श्वभूमी माहीत हवी असे सांगतात.

एकंदरीत, इतक्या लोकांशी बोलूनही हातात काहीच पडत नाही. पण या कादंबरीतील दोन पात्रे- सौभद्र व ज्युलिया कादंबरीतील अल्पभागाचे नाट्य सादरीकरण करतात त्यावरून हे दोघे तरुण एका रहस्याचा शोध घेत आहेत हे त्यांना जाणवते. (पण हा कादंबरीचा अल्प भाग झाला.)

अशा अभिनव तऱ्हेने कांदबरीचा प्रकाशन समारंभ रंगतो. त्यात लेखकाचे व्यक्तिमत्त्वही उलगडण्याचा भाग छान जमतो. औपचारिक प्रकाशनाऐवजी रहस्य उकलण्याचा भाग होऊन शेवटी या कादंबरीच्या इ-बुकचे प्रकाशन सिनेअभिनेता सचिन खेडेकर यांच्या हस्ते होते. कादंबरीचे पुस्तकरूपाने प्रकाशन कुमार केतकर यांच्या हस्ते होते. कादंबरी प्रकाशित झाली असून ती उत्सुकतेपोटी सर्वांनी विकत घेऊन वाचावी असे ग्रंथालीतर्फे धनंजय गांगल जाहीर करतात. या प्रकाशन समारंभाच्या शोधप्रक्रियेत रसिक प्रेक्षक चांगला प्रतिसाद देतात व एका नवीन प्रकाशन समारंभाचा पायंडा पडतो. राहुल सोलापूरकर गुप्तहेराच्या भूमिकेत कादंबरीचा शोध घेण्याचा चांगला प्रयत्न करतात. शेवटी पुस्तकाचे लेखक वसंत लिमये यांची मुलाखत होऊन कार्यक्रम संपतो.

**प्रभाकर भिडे**
भ्रमणध्वनी - ९८९२५६३१५४

**नव्या स्वरूपातील तिसरी आवृत्ती**




**आउशवित्झ छळछावणी**

# नाझी नरसंहार

**कुमार नवाथे**

या पुस्तकातून प्रकट झालेली नाझी क्रौर्याची भयानकता मन गोठवून टाकणारी आहे. आजच्या असुरक्षित जगात म्हणूनच मराठी भाषेतील वेगळे संदर्भमूल्य असलेल्या या पुस्तकाचे मोल निर्विवाद आहे.

**- कुमार केतकर**

**- सुधीर मोघ**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

**- फादर फ्रान्सिस दिब्रेटो, वसई**

# रणजित का मेला?

## डॉ. माधवी मेंहेदळे

वीस वर्षांचा तगडा पण कोवळा रणजित पाच मिनिटांपूर्वी त्याच्या बाबांशी – विनयशी बोलला होता. त्याचा अपघात झाल्याची बातमी विनयनं मला फोन करून सांगितली आणि म्हणाला, 'किरकोळ काहीतरी असेल, त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं आहे. तू पुढे होऊन तुझे डॉक्टरी उपचार सुरू कर. मी पोचतोच तोपर्यंत.' मी पटकन हॉस्पिटलमध्ये फोन लावला. रणजित ॲडमिट झाला आहे का अशी चौकशी केली. पलीकडूनच काही नीट प्रतिसाद मिळेना. मी विचारलं, 'क्रिटिकल आहे का?' 'नाही मॅडम ECG flat आहे.' मी समजले. 'DOA का?' 'हो मॅडम!' DOA - म्हणजे Dead on arrival.

काय सांगू मी विनयला? किरकोळ अपघात आहे अशा समजुतीत तो होता. मीच शॉकमध्ये होते. विनय व अनिताला भेटणं, आधार देणं भागच होतं. विनय म्हणाला, 'आता मी कामावर का जावं हेच समजत नाही. आयुष्य अर्ध्यावर थांबल्यासारखं झालंय.'

तरुण मुलं गेलेले पालक अर्धवट वयाचे असतात. ना धड ते नवीन मुलं जन्माला घालण्याच्या वयाचे असतात, ना धड आयुष्याचे शेवटचे काही दिवस देवाचं नाव घेत घालवू अशा विचाराचे असतात. त्यामुळे रणजित एकटा मरण पावला नव्हता तर त्याच्याबरोबर त्याचं अख्खं कुटुंबही मानसिकरीत्या मरण पावलं होतं. जगण्याची त्यांची ऊर्जा रणजितबरोबर मेली होती. रोज आपण पेपर वाचतो, अपघातात तरुण जीव दगावल्याच्या. अशी बातमी वाचली की आठवतो रणजित आणि आठवतात विनय-अनिताचे भकास डोळे.

का मेला रणजित? का मरतात रणजितसारखी असंख्य तरुण मुलं? देशाच्या समृद्धीत भर पाडू शकतील, काहीतरी निर्माण करू शकतील अशीही मुलं आहेत. प्रश्न पुन्हा तोच. रणजित का मेला? त्याचं मरण टाळता येण्यासारखं होतं का? कालपर्यंत कुणी अनोळखी तरुण मुलं मरत होती रस्त्यावरच्या अपघातात, तेव्हा 'मी' किंवा आपण गुबगुबीत खुर्च्यांवर बसून चहाच्या कपाबरोबर वर्तमानपत्रातल्या या बातम्या चाळत होतो. चहा संपल्यावर विसरूनही जात होतो. पण आता आपल्या अंगणात, आपल्या उंबरठ्यावर ठेपला आहे अपघाती मृत्यू. काल अनोळखी मुलगा, आज मित्राचा मुलगा, उद्या आपल्याच मुलांची पाळी येईल का?

अपघाती मृत्यूचा बकासूर आला आहे. आपल्या सर्वांच्या गावात त्याची भूक वाढते आहे. त्याला घरटी एक माणूस पाठवावा लागतो अशी परिस्थिती येण्याची वेळ आली आहे.

प्रश्न दोन आहेत. पहिला- आपण आता काय करणार? म्हणजे चहाबरोबर बातम्या वाचतो तशाच वाचत राहणार, बकासुराला आपल्या घरातला माणूस पाठवायची आपली पाळी आली की मुकाट्यानं पाठवणार, आपल्या गुबगुबीत खुर्च्यांत बसून चर्चा करणार की काहीतरी हातपाय हलवणार?

दुसरा प्रश्न पुन्हा तोच आहे, की रणजित का मेला?

मी व आपण सगळे अशा मृत्यूंना काही अंशी जबाबदार आहोत असं मला वाटतं.

विनोबांचं एक वाक्य आहे जे डॉ. अभय बंग त्यांच्या बालमृत्यूच्या प्रोजेक्टच्या संदर्भात नेहमी उच्चारतात. ते असं आहे- 'झाडाचं एखादं पान जेव्हा गळतं तेव्हा संपूर्ण झाडाची त्याला मुकसंमती असते. त्याशिवाय अशी घटना घडू शकत नाही.' तसंच जेव्हा एखादाही रणजित रस्त्यावर मरतो तेव्हा तुम्हा-आम्हा सर्वांची त्याला मुकसंमती असते. आपला त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असतो.

आपली मुलं लहानाची मोठी होतात तेव्हा आपण त्यांना काय काय शिकवतो? लिहायला-वाचायला-पोहायला, वागायला वगैरे. पण ट्रॅफिकमध्ये गाडी कशी चालवायची याचं शिक्षण देतो का? कुठलीही व्यवस्थित सिस्टिम आपल्या पिढीनं उभारली नाही जी मुलांना ट्रॅफिकचं शिक्षण देईल. मोटारसायकल जोरात चालवायची, मोटारसायकलवर कसरती करायच्या. यात जीवाचा धोका आहे, यात कुठलाही 'स्मार्टनेस' नाही हे आपल्या मुलांच्या मनावर आपण बिंबवू शकलो का?

माणसानं माणसाच्या विकासासाठी वाहनं, मोठे रस्ते तयार केले आणि ते भस्मासुरासारखे आपल्याच मुलांना गिळंकृत करू लागले. माणसाच्या बुद्धीचा, माणसाच्या आयोजन कौशल्याचा हा सपशेल पराभव नाही का?

पुढच्या पिढीला ट्रॅफिक नियमांची

माहिती, त्याच्या पालनाचं महत्त्व न पाळल्यास होणाऱ्या गंभीर परिणामांची कल्पना, जरूर तेव्हा पुरेशी शिक्षा आणि योग्य इन्फ्रास्ट्रक्चर न पुरवल्याचा गुन्हा आपण केला आहे. आपल्या पिढीनं केला आहे. वाहन नावाचं 'अस्त्र' आपण त्यांच्या सुपूर्द केलं पण ते चालवण्याचं कोणतंही प्रशिक्षण दिलं नाही. ते अस्त्र त्यांच्या स्वत:वरच केव्हाही उलटू शकतं. मुलं शिकतात ते त्यांच्या शाळांमधून आणि मोठ्यांचं अनुकरण करून, आजुबाजूच्या वातावरणातून. त्यांना ट्रॅफिक शाळा पुरवण्यात तर आपण अपयशी ठरलोच, शिवाय आजुबाजूला मुलं मोठ्याकडं बघतात तेव्हा त्यांच्या वागण्यातून ट्रॅफिक नियम पाळण्यापेक्षा नियम न पाळणं व अपघाताला आमंत्रण हेच ती अधिक शिकतात, हाही आपल्या पिढाचा गुन्हा.



कितीतरी पालक आपल्या मुलांना परवाना/लायसन्स नसतानाही गाडी चालवायला देतात. अभिमानानं सांगतात, की आमचा मुलगा सातवीत आहे पण छान स्कूटर चालवतो. अशा पालकांनो, रस्त्यावर जे असंख्य रणजित मरतात त्यांना तुम्ही पण जबाबदार आहात. त्यात तुमचाही रणजित असू शकतो. वाहन चालवण्याची परिपक्वता ज्या वयात येते त्यापेक्षा लहान असलेल्या मुलाच्या हातात वाहन देऊन तुम्ही नक्की काय साधत आहात? त्याच्या जीवाला धोका आणि रस्त्यावरच्या इतरांच्याही जीवाला धोका.

दहावीची परीक्षा झाल्या झाल्या, पालकांच्या अपरोक्ष गाडीची किल्ली घेऊन, आपल्या मित्रांना गाडीत भरून, भरधाव गाडी चालवून कोवळी मुलं मृत्युमुखी पडली ही घटना पुण्यात अजून ताजी आहे. काय झालं असेल त्या पालकांचं? त्या मुलांपैकी कुणालाच लहान वयात गाडी चालवणं जीवावर बेतण्याएवढं धोकादायक असू शकतं याची कल्पना आपण-पालक/शाळा/शासन यांनी दिली होती का?

अनेक पालक अल्पवयीन मुलांना गाडी चालवायला प्रोत्साहित करतात. त्यांचं कौतुक करतात. कुठलंही प्रशिक्षण नाही. वय व विचार परिपक्व नाही. अचानक उद्‌भवलेल्या परिस्थितीशी कसा सामना करायचा याचं भान असणं शक्य नाही. वेगावर नियंत्रण, वाहन चालवताना मनाची एकाग्रता, वळणावर गाडीवर संपूर्ण ताबा असं काही अल्पवयीन मुलांच्या बाबतीत असण्याची शक्यता कमीच. याउलट गाडी चालवायला मिळाली याची एक्साइटमेंट, अतिवेगानं गाडी चालवण्यातलं थ्रिल आणि वेडीवाकडी गाडी चालवून इतरांना इम्प्रेस करण्याची इच्छा असणं स्वाभाविक आहे.

पोलिस बघत असेल तर लाल सिग्नलला थांबणं, पोलिस बघतात म्हणून सीटबेल्ट लावणं ही तुम्हा-आम्हा सर्वांची मानसिकता आहे. यात पोलिसानं आपल्याला दंड करणं हा मुद्दा महत्त्वाचा नसून आपली सुरक्षितता महत्त्वाची आहे, हा मुद्दा विसरला जातो. मग अधिकारी होऊन पैसे खाणं जसं वैध वाटू लागतं. तसंच पालकांना वाहतुकीचे नियम मोडणंही वैध वाटू लागतं. पोलिस नाही ना मग घाल लाल सिग्नलला गाडी पुढे, नो एंट्रीमधूनही घाल गाडी असे संदेश पालकच मुलांना देऊ लागतात. तीच गोष्ट हेल्मेटची आहे. कोणत्याही हॉस्पिटलच्या अस्थिरोग भागात जाऊन बघा किंवा आयसीयुमध्ये जाऊन बघा. हेल्मेट न घातल्यामुळे ॲडमिट असलेले, डोक्याला गंभीर दुखापत झालेले पेशंट बघा. का आपण हेल्मेट घालत नाही आणि का मुलांवर ते बिंबवत नाही याचं मला आश्चर्य वाटतं. टोचतं, ऐकू येत नाही, कुठे ठेवायचं कळत नाही, बाजूचं दिसत नाही, हेअरस्टाईल बिघडते अशी असंख्य कारणं सांगितली जातात. यात जिवंत राहणं, पॅरालिसिस न होणं हे जास्त महत्त्वाचं नाही का?

एका हातानं मोटारसायकल सावरत दुसऱ्या हातानं मोबाईल कानाजवळ धरलेला आहे असं दृश्य आता सर्व वयाच्या लोकांसाठी नित्याचं झालं आहे. मधून कधीतरी मोबाईल डोळ्यांसमोर धरून त्यावरचं वाचण्याचाही प्रयत्न गाडी चालत असताना झालेला दिसतो. आपण रस्त्यावर आहोत, हातात चालत्या स्थितीतील वाहन आहे, रस्त्यावर धावणारी असंख्य वाहनं आजुबाजूला आहेत, चालणारी माणसं आहेत; अशा स्थितीत मन, कान आणि डोळे जर मोबाईल फोनवर केंद्रित असतील तर काय घडू शकेल? अगदी मिनिट-दोन मिनिटाचा खेळही कुणाचे आयुष्य उद्‌ध्वस्त करण्यास पुरेसा आहे. अगदी बसचालक आणि ट्रकचालकही कानाला मोबाईल लावून दिसतात. मग का नाही अपघात होणार? अनेक घरांतील रणजित

यामुळे मेले असतील, आताही मरत आहेत. मोबाईल फोनवर बोलणं आणि एसएमएस वाचणं एवढं महत्त्वाचं असतं का? गाडी बाजूला घेऊन, थांबून ते होऊ शकत नाही का?

आपण जेव्हा वाहन चालवताना मोबाईल वापरतो तेव्हा आपल्याकडून जरी प्रत्यक्ष अपघात झाला नाही तरी इतरांवर तसेच संस्कार करून आपण अप्रत्यक्षरीत्या अपघात घडवण्यात कारणीभूत ठरतो.

मद्यप्राशन करून वाहन चालवणं हा अजून एक महत्त्वाचा मुद्दा. रात्री पार्टी झाली की दारू पिणं हे नुसतं जगन्मान्य, समाजमान्य नाही तर सामाजिक प्रतिष्ठेचं लक्षण आहे. आपले पालक असे पार्ट्यांमध्ये दारू पिऊन नंतर आपापलं वाहन चालवत घरी जाताना मुलं कायमच बघतात. किती दारू प्यायली आहे, त्यानंतर स्वत:वर किती ताबा आहे, त्यांचे सर्व reflexes – प्रतिक्षिप्त क्रिया – किती काम करत आहेत याचं मोजमाप कुणी लावायचं, कसं लावायचं?

तरुण मुलांच्या मनात असे परिपक्व विचार येतील, की त्यांनी जे लहानपणापासून पाहिलं आहे तेच त्यांच्या मनावर जास्त बिंबलेलं असेल? पेग–दोन पेग घेऊन वाहन चालवणं तर त्यांना अगदी नॉर्मलच वाटणार. पार्टीमध्ये कुणी न पिणारा असेल तर त्या मुलाला बावळट, कुक्कुलं बाळ, वाढ खुंटलेला अशी सर्व विशेषणं लावून नामोहरम करण्याचा प्रयत्न अविरत सुरू असतो. दारू प्यायलेला त्यांच्यातील एखादा 'मर्दानी' मुलगा मग गाडी–चारचाकी, दुचाकी चालवतो. इतरांनाही आपल्याबरोबर घेतो आणि सर्व प्रकारच्या अपघातांना सन्मानानं आमंत्रण धाडतो.

विचार करा – या सगळ्यात आपल्या सगळ्यांचा काहीच हातभार नाही का? म्हणूनच म्हटलं, की कोणत्याही रस्त्यावर कुठेही जेव्हा एखादा रणजित मरतो तेव्हा त्याला आपली मुकसंमती असते.

काही महाग गाड्यांमध्ये, आदळल्या–नंतर एअर बॅग्ज पुढे येतात व संरक्षण करतात. अशा चांगल्या गाड्यांमध्ये बसलेल्या लोकांना अपघात झाला तरी एअर बॅग्जमुळे काही मार लागत नाही असा समज आहे. पण अशा गाड्यांमध्ये बसलेले लोकही अपघातात दगावले असं जेव्हा लक्षात आलं तेव्हा त्याची कारणं शोधली गेली. त्यात असं लक्षात आलं की सीट बेल्ट लावलेलाच नव्हता. त्यामुळे एअर बॅग्जचा उपयोग झाला नाही. कित्येकदा गाडी जोरात आदळल्यावर ड्रायव्हर वाचतो कारण त्यानं सीट बेल्ट लावलेला असतो व मागे बसलेले मालक दगावतात. त्यांनी सीट बेल्ट लावलेला नसतो. गाडीनं पलट्या खाल्ल्या तर अर्थातच गंभीर मार बसतो. समोर पगारी वाहनचालक व मागे मालक म्हणून बसणाऱ्या लोकांना हे माहिती नसेल असं वाटत नाही. तरी, मागच्यांनी सीट बेल्ट लावला पाहिजे असा नियम नाही असं जोरात सांगितलं जातं.

संशोधनाचे आकडे असं सांगतात, की अपघात होण्याचं प्रमाण रात्रीच्या प्रवासाच्या वेळी आठ पटींनी जास्त असतं. रात्री प्रवास करणं गरजेचं आहे का याचा नीट विचार झाला पाहिजे. अशा प्रवासानं कामाचा एखादा दिवस वाचू शकेल पण आयुष्याचा प्रवास संपण्याचा धोका आहे. अंधारात रस्त्याच्या कडेला थांबलेली वाहनं न दिसल्यामुळे गाड्या त्यावर जोरात आदळून अपघात होतात. थांबलेल्या गाड्यांना मागे रिफ्लेक्टर्स किंवा त्यांचं अस्तित्व दाखवणारा काही मार्ग आहे का? ब्रेक टायर, हवा, ब्रेकलाईट, रिफ्लेक्टर्स, पुढचे–मागचे दिवे इत्यादी व्यवस्थित आहे का हे पाहणं ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे.

माझ्याकडे एका गावाबाहेरच्या शाळेतील मुलं डोळे तपासायला येतात. नेहमी त्यांना शाळेची एक बस गावात घेऊन येते. एक दिवस बस ड्रायव्हरनंही त्याचे डोळे माझ्याकडून तपासून घेतले. तपासल्यावर मला धक्का बसला. कारण त्या बस ड्रायव्हरला एका डोळ्यानं अजिबात दिसत नव्हतं. त्याला लायसन्स कसं मिळालं, ते मिळायला नको होतं हे तर स्वतंत्र मुद्दे आहेत, पण त्या शाळेतल्या कित्येक लहान मुलांच्या जीवाची जबाबदारी अशा एका डोळ्यानं आंधळ्या ड्रायव्हरवर सोपवली गेली होती आणि कुणाला त्याची कल्पनाही नव्हती. आपल्या वाहनचालकाची वैद्यकीय तपासणी आपण खाजगीरीत्या करून घेऊ शकतो ना!

रस्ता ओलांडणं हा संस्कार मुलांच्या दृष्टीनं महत्त्वाचा आहे. अगदी थोड्या अंतरावर पुढे झेब्रा क्रॉसिंग असेल तरी तिथपर्यंत जायची तसदी घ्यायला नको असते. रस्ता दुभाजक असेल तर त्यावरून उड्या मारून रस्ता ओलांडला जातो. तीच गोष्ट फूटपाथची. फूटपाथ जिथे असेल तिथून चालण्यानं, चालणाराही सुरक्षित राहतो व वाहन चालवणारा विना अडथळा वाहन चालवू शकतो. पण फूटपाथ असूनही त्यावर न चालता रस्त्यावर घरंगळणारे कित्येक पादचारी दिसतात. लहान मुलांना हे सगळं दिसत असतं.

बीआरटीचा प्रयोग पुण्यात झाला. त्यात शासनानं काय करायला हवं हा स्वतंत्र मुद्दा, पण नागरिक बीआरटीसाठी राखून ठेवलेल्या रस्त्यावर चालतात, दुचाकी, चारचाकी सर्रास घालतात. संरक्षक कठडे ओलांडून त्यावर उड्या मारतात. त्यात कित्येकांनी जीव गमावला आहे.

जबाबदार नागरिकाचं अजून एक कर्तव्य मला महत्त्वाचं वाटतं. ते म्हणजे नगरसेवक, पालिका, शासनकर्ते यांच्या संपर्कात राहणं व आक्षेपार्ह किंवा चुकीच्या गोष्टींची नोंद त्यांच्याकडे करणं. जीवघेणा खड्डा आहे, सिग्नल चालत नाही, पाटी चुकीची लागली आहे अशा कित्येक गोष्टी नागरिक रिपोर्ट करू शकतात. हल्ली इ–मेल, फेसबुक, वेबपेज अशी सोपी माध्यमं उपलब्ध आहेत. ट्रॅफिक खात्यानं नागरिकांशी संवाद साधण्यासाठी काही वेळ मुद्दाम राखून ठेवलेला असतो. पण तरी परिस्थितीवर नुसते ताशेरे ओढण्यात वेळ घालवला जातो. सक्रिय सहभाग सहसा होत नाही. रस्त्यावर अपघात का होतात आणि ते टाळण्यासाठी काय करता येईल हा अनेक कंगोरे व अनेक पैलू असलेला

विषय आहे.


शहरीकरण, वाढती लोकसंख्या, अपुरे रस्ते, चुकीचे सिग्नल, चुकीच्या पाट्या, रस्त्यावरचे खड्डे, अपुरी व अकार्यक्षम सार्वजनिक वाहतुकव्यवस्था, महापालिकेच्या दोन खात्यांमधील समन्वयाचा अभाव, अपुरी पोलिस संख्या, सर्व ठिकाणी बोकाळलेला भ्रष्टाचार, सुधारणा करण्यासाठी लागणाऱ्या राजकीय इच्छाशक्तीचा अभाव... अशी ही न संपणारी यादी आहे. ब्लेम गेमच्या चक्रात न अडकता, रस्त्यावरच्या अपघातांना सामान्य माणसाकडून कसा हातभार लावला जातो व त्यावर काय उपाय करता येतील या मुद्यांवर लक्ष केंद्रित करण्याच्या या लेखात मी प्रयत्न केला आहे. स्वयंशिस्त हा महत्त्वाचा मुद्दा त्यात येतो.

लहान मुलांवर चांगलं ट्रॅफिक शिक्षण व चांगले ट्रॅफिक संस्कार हा कळीचा मुद्दा आहे असं मला वाटतं. काही सामाजिक संस्थांच्या मदतीनं ट्रॅफिक नियम समजावून सांगणाऱ्या छोट्या छोट्या ॲनिमेशनपटांची निर्मिती करून, त्या सर्वदूर दाखवण्याच्या प्रयत्न मी व माझे सहकारी करत आहोत. रणजित गेल्यानंतर निर्माण झालेल्या पोकळीवर व विनय-अनिताच्या डोळ्यांतील भकासपणावर माझ्या पद्धतीनं उतारा शोधण्याचा केलेला हा एक छोटा प्रयत्न आहे.

प्रत्येक जबाबदार नागरिकानं भान ठेवून आपली जबाबदारी निभावली पाहिजे. म्हणजे तुमच्या-आमच्यातले निदान काही रणजित रस्त्यावर मरणार नाहीत आणि अपघातांच्या बकासुरांच्या तोंडी आपल्या घरातला माणूस देण्याऐवजी अपघातांच्या बकासुराचा नायनाट करण्यास मदत होईल, अशी आशा करूया!

**डॉ. माधवी मेहेंदळे**
madhavimehendale@gmail.com
भ्रमणध्वनी ९८९०९०४१२३

## प्रसिद्ध झालेली




**'उंबरठ्यावरचे दिवस'**


**भाऊ गावंडे**


**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**

**साहित्य : आस्वाद आणि अनुभव**

**द.ता. भोसले**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




**मनस्वी**

**बाबूराव चंदावार**

**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**

# ‘क्रमश:’ कादंबरी : अभिवाचन व चर्चा

## श्रीधर गांगल

‘‘आधी केशवसुतांची कविता... मग मर्ढेकरांची कविता... त्यानंतर नेमाडेंची ‘कोसला’.. त्या त्या वेळच्या साहित्यकृती मराठी वाचकाला ‘चकवा’ देणाऱ्या वाटल्या. त्यांचे विषय, त्यातील विचार, लिखाणासाठी स्वीकारलेला आकृतिबंध, भाषा, आविष्कार... सगळेच धक्कादायक वाटले. पण आज मागे वळून पाहताना, ते मराठी साहित्यातील ‘माइल स्टोन’ वाटतात. डॉ. महेश केळुसकरांची ‘क्रमश:’ कादंबरीही तशीच ‘माइल स्टोन’ ठरेल.’’ इति मधु मंगेश कर्णिक.

निमित्त होते १० जून २०१२ रोजी झालेला साजरा ‘मराठी साहित्य परिषद’, ठाणे शाखेचा ३३वा वर्धापद दिन.

प्राचार्य म.वि. फाटक मुदतपूर्व निवृत्ती स्वीकारून, जळगावहून कायमच्या वास्तव्यासाठी ठाण्याला आले. ते ‘मसाप’चे सक्रिय पदाधिकारी होते. ठाण्यात त्यांनी, ‘मसाप’च्या शाखास्थापनेत पुढाकार घेतला. प्रथम विभागीय (१९८७) व नंतर अखिल भारतीय (१९८८) साहित्य संमेलन यशस्वी करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्यामुळे ठाणे शाखेला स्थैर्य लाभले, साहित्यजगतात नाव झाले. त्यामुळेच कृतज्ञता/त्यांची आठवण ‘म.वि. फाटक स्मृतीदिना’ने साजरी होते. वर्षाकाठी किमान सहा दर्जेदार कार्यक्रम देण्याचा ‘मसाप’ ठाणे शाखेचा प्रयत्न असतो.

यावर्षी वर्धापन दिनानिमित्त डॉ. महेश केळुसकर ह्यांच्या ‘क्रमश:’ या कादंबरीचे अभिवाचन नि प्रश्नोत्तररूपी चर्चा ठेवली होती. मधु मंगेश कर्णिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. किशोर सोमण यांनी सूत्रसंचालन केले. उपस्थित रसिकांनी कादंबरीच्या संबंधात प्रश्न विचारले नि त्यांचे तद्‌जन्य समीक्षक डॉ. अनंत देशमुख, प्रा. सुहासिनी कीर्तिकर नि पत्रकार राजीव खांडेकर यांनी आपल्या परीने उत्तरे दिली. त्या चर्चेतून जाणवलेली कादंबरीची वैशिष्ट्ये अशी–

● सर्वसाधारण मराठी कादंबरीला असते तसे ठरावीक कथानक नाही, पण जसजसे आपण वाचत जातो, तसतशी आपणास समकालीन वास्तव नि विस्तवाची धग जाणवू लागते. त्याने वाचक स्वत:ला प्रश्न विचारू लागतो. हे कादंबरीचे मोठे यश आहे.

● कादंबरीत पत्रे आहेत, पण वा.म. जोशी यांच्या ‘इंदू काळे सरला भोळे’प्रमाणे ती संपूर्ण पत्रात्मक नाही. मधूनमधून पात्रांच्या भेटीगाठी झाल्यावर झडणारे संवाद आहेत, पण ती केवळ संवादात्मक नाही. मनाशी चाललेला संवाद आहे, पण केवळ चिंतनात्मक, आत्मकथनात्मक नाही. ठरावीक फॉर्म नाही. तरीही ती प्रवाही आहे. पुढे वाचत राहावेसे वाटावे, अशी उत्सुकता, वाचनीयता तीत आहे. तटस्थ वाटली तरी डोळस आहे. सामाजिक भान आहे. वास्तवाची जाण आहे. स्वत: उत्तरे देत नाही, शोधत नाही पण प्रश्न उभे करते. वाचकाला विचार करायला प्रवृत्त करते.

● बाळू कासार घोड्यावरून मंत्रालयात जातो (पान ९), सहा वर्षांची पहिलीतील मुलीची आत्महत्या (पान ९), दुसऱ्याच्या मनातील विचार कळणारा, सामान्य परिस्थितीतील घरगुती खानावळवाला (पान ८) नि त्याच्या व्यवसायाशी विसंगत वाटावी अशी त्याची पाक्षिक प्रकाशनाची हौस (पान ८) व त्यावर कडी म्हणजे चार महिन्यांचे खानावळीचे बिल थकलेल्या ग्राहकाला, त्याबदल्यात, पाक्षिकासाठी ‘क्रमश:’ कादंबरी लिहावयास सांगणे (पान ८), ‘सायकल चोरीला गेल्याची फतरूड तक्रार घेऊन काय आलात? देश चोरीला गेलाय अशी तक्रार करणार असाल तर नोंद करतो’ इति पोलिस अधिकारी (पान १८), अनुसूचित क्षेत्रात सत्याग्रह हे शस्त्र जवळ बाळगल्याबद्दल महात्मा गांधींना टाडाखाली अटक झाली आणि नंतर संजय दत्त यांनी त्यांना जामीन देऊन सोडवले. (पान ४८), (एका कल्पक जाहिरातदाराने जगातील तमाम लोकांना सकाळच्या न्याहारीबरोबर संत्र्याचा रस प्यायला शिकवले नि संत्री पिकवणाऱ्या शेतकरी लोकांची, मार्केटिंगची समस्या मिटवली.) विदर्भातील कापूस पीक सर्वच सरकारांची डोकेदुखी झाली आहे. जर कापसाचे सूप, कापसाचे कबाब, फ्राइड कॉटन राईस असे पदार्थ कोणी उत्पन्न केले तर? (पान ५०)... सारेच अशक्यप्राय, चमत्कारिक वाटावे अशी विधाने, व्यक्ती, यामुळे 'Magical Realism' चा एक वेगळा आविष्कार कादंबरी घडवते.

● बिननावाचा लेखक, लंगोटी पाक्षिक (दिनवार्ता) नि नायकाने लिहिलेल्या कादंबरीचे कथानक सलगपणे न सांगता, कादंबरीसंबंधात वाचकांच्या प्रतिक्रिया, पत्रे छापणे, त्या प्रतिक्रियांद्वारे कादंबरी कशी आहे याची चर्चा करणे, रसिक वाचकाची उत्सुकता चाळवणे, ह्यात लेखकाची चलाखी दिसते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्राध्यापक चंद्रहास किंबहुने ह्यांची पत्रे/प्रतिक्रिया. ते म्हणतात, ‘‘मी ही कादंबरी शेवटपर्यंत वाचणार आहे. व्याकुळतेतून लिहिली गेल्याने, तिला भाषेची अडचण असणार. लेखकाला आपल्या अनुभवात इतरांना सामील करून घ्यायचं असावं. त्याच्या अनुभवात लोकांना किती रस असेल? तो सांगतो आहे ते दुर्बोध वाटते. पण गोष्टीपेक्षा, त्याच्या मानसिक अवस्थेच्या

संक्रमणाचा अनुभव आपण घेऊ शकतो काय? हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो.'' (पान १०)

लेखकाची वाचकाकडून अशीच अपेक्षा असावी. ती वाचताना, पुढे हेच प्रा. लेखकाची कादंबरीच्या संबंधात तसेच साहित्यविषयक मते मांडत असावेत, असे वाटत राहते.

● कादंबरीची भाषा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावा. गेल्या २५ वर्षांत, जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण यांच्या प्रभावाने, वेगाने बदल झालेली सामाजिक-आर्थिक-नैतिक क्षेत्रातील मूल्यांची पडझड व त्याचा महानगरीय सामान्य माणसाच्या जीवनावर झालेला परिणाम या वास्तवाचे, अवकाशाचे चित्रण-वाचकाने ते अनुभवावे म्हणून- लेखक करतो. त्यामुळे ते अनुभव व त्याची भाषाही आजची झाली आहे. पण कादंबरीचा कॅन्व्हास बघितला तर त्यात गंडभीर (बंद कापड गिरणी कामगार, अल्पशिक्षित), त्याच्या बारमध्ये उपजीविकेसाठी काम करणाऱ्या मुली, प्रथम गँगस्टर नि नंतर आमदार झालेला मुलगा हे कनिष्ठ आर्थिक स्तराचे प्रतिनिधी, माधवी प्रधान-चिटणीस, मनोरमा-आत्माराम हे टिपिकल मध्यमवर्गाचे प्रतिनिधी, पहिली-दुसरी नव्या जमान्याच्या आयटी इन्कम ग्रूपच्या, अण्णा साठ्ये चांगले उत्पन्न कमावत्या मुलांचे पालक, थोट्या-मामू-सलीम हातावर पोट असलेले, प्रो. किंबहुने उच्चशिक्षित. साहजिकच, शिक्षण, आर्थिक स्तर ह्यामुळे पात्रांची भाषा, विषय, विचार यात अंतर पडते. भाषेची ही सरमिसळ, प्रसंगांचे नि पात्रांचे स्वभावविशेष स्पष्ट करते. विशेषत: नव्या पिढीच्या सुशिक्षित स्त्रियांची भाषा आपणास विस्मित करते. उदाहरणार्थ, स्तनाचे सहजपणे टणक नारळ नि पुष्ट नितंबाचा पुठ्ठ्यांचा असा उल्लेख करते. ऑफिसमध्ये गेल्या गेल्या शिव्यांनीच सुरुवात करणे, नागडाच केला मी त्याला भरसभेत असे बिनधास्त उद्गार काढणे, प्रथम दोघी सहकारी, मग एकमेकींच्या प्रेमात. लेस्बियन. सगळेच धक्कादायक. हे जुन्या संस्कारात वाढलेल्यांना पचणे कठीण. तशा त्यांच्या प्रतिक्रिया कादंबरीत आढळतात. वाचताना भाऊ पाध्ये यांची आठवण येते.

पण साहित्य, विशेषत: काव्य हा लेखकाचा जिव्हाळ्याचा विषय असावा. प्रा. किंबहुने, नायक किंवा प्रो. बेजकर यांचे पत्र/प्रतिक्रियांद्वारे त्यांनी आपलेच विचार व्यक्त केल्यासारखे वाटते. बालकवी, वसंत सावंत, संत तुकाराम, सदानंद रेगे अशा अनेक कवी/शायर यांच्या काव्यपंक्तींचा उल्लेख त्यात आढळतो. कादंबरी अनेक विषयांना स्पर्श करते. बंद गिरण्या नि त्यामुळे उद्ध्वस्त झालेले कामगारजग, वैद्यकीयसेवा क्षेत्राचे बाजारीकरण, हातावर पोट असणाऱ्या लोकांचे प्रश्न, भाषा-भाषिक पुरस्कार- त्यातील गैरप्रकार... अनेक. पण समस्यांचे कारण व त्याचे निराकरण, ह्यात तो स्वत:ला अडकवून घेत नाही.

● वरवर पाहता पुस्तकाची सुरुवात नि शेवट कादंबरीचा नायक-लेखक याच्या निवेदनाने होते. पण स्वप्न/FANTASY मुळे, पान ३५ प्रमाणेच पान ११३ ते ११८ ह्या शेवटच्या पानांवरील दृश्यामुळे, कादंबरीला वेगळेच वजन (WEIGHTAGE) प्राप्त झाले आहे. प्रकरण ३६ वे लिहून झाल्यावर, लेखक (नायक) पुन्हा खानावळीत येणार नाही व पुढील प्रकरणेही लिहिणार नाही, हे 'घखामि'ला नायकाच्या मनातील कळते. त्यावेळी नायक त्याच्या डोळ्यांत पाहतो. 'मैलोन्मैल पसरलेलं वाळवंट तुडवून आल्यावर पाण्याची विहीर दिसावी; पण विहिरीत डोकावल्यावर फक्त वाळूच दिसावी, तसे त्याचे डोळे होते.' (पान ११३) किंवा 'पहिल्याच रात्री नवऱ्याचे नपुंसकत्व जाणवलेली, शरीरसुखासाठी आसुसलेली पण स्वत:च्या (वय ३६) लैंगिक वासना (६ वर्षे) दाबून ठेवलेली 'घखामि'ची बायको, अंधाऱ्या खोलीत, पाय पोटाशी दुमडून, मोडक्या गायीसारखी पडलेली होती. वस्त्रांच्या चिंध्यांमधली जितीजागती आग, आता जागच्या जागी धडधडत होती. विश्वाचं आर्तच जणू काय!' (पा. ११३) असे सारे मनोव्यापार सांगणारे हे कल्पनाविलास/रूपके मुळातूनच वाचावे असे आहे.

प्रा. किंबहुने लिहितात, 'दु:ख कधीच नाहीसं होणार नसतं. जन्माबरोबर ते चिकटलेलं असतं. आईपासून नाळ तोडून बालकाला अलग केलं तरी दु:खापासून नाळ तोडता येत नाही... लेखकाचे लेखन अपूर्ण राहिलं म्हणून खंत करू नये. कोणीतरी ते पुढे लिहील; पण तेही अपूर्णच राहील. ह्या अपूर्णत्वाचा स्वीकार करणं म्हणजेच दु:ख जाणून घेणं होय...' (पा. ११८) हेच या कादंबरीचे सार वाटते. कादंबरी लेखनामागचे उद्दिष्ट वाटते. कारण अनेक विषयांना स्पर्श केल्याने, कादंबरीचा आवाका मोठा झाला आहे नि ते सारे ११८ पानात सामावणे कठीण आहे, याची लेखकास जाणीव असावी. पण त्याचा प्रयत्न बऱ्याच अंशी सफल झाला आहे. ज्येष्ठ पत्रकार नि विचारवंत दिनकर गांगल यांच्या मते भाऊ पाध्ये यांच्या 'वासूनाका'नंतरची ही महत्त्वाची कादंबरी आहे. लेखक तो वारसा पुढे नेत आहे, असे कादंबरी वाचनानंतर वाटते. हे कादंबरीचे यश आहे.

कादंबरीच्या सुरुवातीस बाळू कासार घोड्यावर बसून मंत्रालयापर्यंत पोचतो. मंत्रालय म्हणजे व्यवस्था. ती बदलण्याचा त्याचा उद्देश. पण व्यवस्था त्यालाच वेडा ठरवून वेड्याच्या इस्पितळात टाकते. कादंबरीच्या शेवटी नायकाला घोडा दिसतो. तो बाळू कासाराचा असेल काय? त्याच्या मनात येते. तो मनातल्या मनात घोड्याच्या पाठीवर मांड टाकतो. हा स्वप्नील पण सकारात्मक शेवट आशादायी आहे. वर्तुळ पूर्ण करणारा आहे.

प्रारंभी कार्यवाह पद्माकर शिरवाडकर यांनी 'मसाप'च्या कार्याचा आढावा घेतला. किशोर पेंढारकर, त्यांची पत्नी अंजली, मुलगी क्षितिजा व मोरेश्वर गोखले यांनी कादंबरीच्या संक्षिप्त/संपादित भागाचे केलेले अभिवाचन रसपूर्ण नि प्रभावी झाले. ज्यांनी ही कादंबरी अगोदर वाचली असेल त्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद लाभला असेल आणि ज्यांनी ती वाचली नसेल त्यांना ती वाचावयाची ओढ वाटली असेल.

प्रा. पद्मा देशपांडे यांच्या तीन पुस्तकांचे ह्यावेळी प्रकाशन झाले.

**- श्रीधर गांगल**
shreedhargangal@gmail.com

# यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त आयोजित ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे



डोंबिवली येथील १८ ते २३ जून २०१२ दरम्यान आयोजित ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त रामनाथ सोनवणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रभाकर भिडे, शिवाजी धनके आणि रामनाथ सोनावणे



RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001


# लॉक ग्रिफिन

## वसंत वसंत लिमये

गेल्या तीन पिढ्यांचा संदर्भ असलेली, आंतरराष्ट्रीय राजकीय-सामाजिक पटावर उलगडणारी उत्कंठावर्धक कादंबरी

एक महत्त्वाकांक्षी कादंबरी. आंतरराष्ट्रीय दर्जाची. मराठीत प्रथमच एवढ्या प्रचंड कॅनव्हासवर मांडलेली, राजकारणी पार्श्वभूमीत रंगलेली, काळजीपूर्वक संशोधनावर आधारित, उत्कंठा वाढवत नेणारी एक सनसनाटी आणि प्रचंड साहसकहाणी.

**– प्रा. अच्युत वझे,** नाटककार

कादंबरीची जातकुळी रॉबर्ट लडलमच्या भव्य, अभ्यासपूर्ण आंतरराष्ट्रीय कथानका-प्रमाणे आहे. ह्या कादंबरीवर सहजपणे एका ब्लॉकबस्टर चित्रपटाची निर्मिती होऊ शकेल.

**– सचिन खेडेकर,** अभिनेता

चित्तथरारक आणि खिळवून ठेवणारी कादंबरी म्हणजे लॉक ग्रिफिन. आंतरराष्ट्रीय राजकारणाची नीतिहीन बाजू उघडी करणारी कादंबरी म्हणजे लॉक ग्रिफिन.

**– डॉ. अनिल व डॉ. अश्विनी नेने,** लंडन

स्वप्न आणि वास्तव यांत अंतर असते, परंतु ही कादंबरी वाचताना वास्तव स्वप्नवत वाटते आणि हे अंतर कमी होते. हलवून सोडणारी व अनपेक्षित वळणे घेणारी कथा, भन्नाट वेगाने पुढे जाते. मराठीत अभावानेच आढळणारा आकृतिबंध असलेली ही कादंबरी.

**– श्रीराम दांडेकर,** कॅम्लिन उद्योगसमूह

Scarily realistic,makes you wonderif there is a lot of truth camouflaged in this action thriller. Start reading this only if you have time to finish!

**- Prakash Rao**
Nature Lover and Computer Professional
Virginia, Washington DC.

**प्रथम आवृत्ती १५ दिवसांत संपली**

**मूळ किंमत ५०० रु. • सवलतीत ३०० रु.**

पाहा वेबसाईट
www.lochgriffin.in


'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.